प्रकरण १ ले

# लोकसाहित्य व लोकगीते यांच्या व्याख्या व स्वरूप

# प्रकरण १ ले
# लोकसाहित्य व लोकगीते यांच्या व्याख्या व स्वरूप

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. या समाजातच माणूस लहानाचा मोठा होतो. समाजामुळे व्यक्तीला स्वत:चा अर्थ गवसतो. माणसाच्या जगण्याला आकार देण्याच कामही हा समाजच करत असतो. याच समाजातून साहित्य निर्माण होतं. खर तर साहित्याचा जन्मच मुळी समाजातून होत असतो. त्यामुळे लोकसाहित्यही याला अपवाद कसे असेल? लोकसाहित्य ही देखील प्रामुख्याने समाजमनाची निर्मिती असते. तसेच या समाजाचे यथायोग्य चित्रण लोकसाहित्यातून झाल्याचे आपण पाहत आलो आहोत. मुळात संवेदनशील असणाऱ्या मानवाकडे आपल्या सर्व भावभावना व्यक्त करण्याची क्षमता आहे. याच क्षमतेतून मौखिक रूपात लोकसाहित्याची निर्मिती मानवाने केली आहे. या लोकसाहित्यातून लोकजीवनाचे दर्शन घडत असते. त्यामुळे लोकसाहित्य आणि मानव यांचे नाते अतूट आहे. या लोकसाहित्यामध्ये लोकगीताबरोबर, लोककथा, लोककथागीते, लौकीक गीते, लोकनृत्य, लोककला, रूढी-परंपरा, उखाणे, म्हणी, वाक्प्रचार, लोकसमजुती या मौखिक वाङ्मयाचा सामावेश होतो.

## १) <u>लोकसाहित्याची प्राचीनता</u> :-

लोकसाहित्याची निर्मिती आज-कालची नाही तर फार प्राचीन काळापासून याच्या निर्मितीस प्रारंभ झाला आहे. लोकसाहित्याचे प्राचीनत्व देखील त्याचे एक महत्वाचे वैशिष्टय आहे. या संदर्भात डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात की, ''लोकसाहित्य ही आदिकाळापासून चालत आलेल्या व प्रत्येक व्यक्तीच्या मनात घटक रूपाने असलेल्या लोकमानसाची अभिव्यक्ती झाली आहे, असे सर्वच मानसशास्त्रज्ञ मानतात. मानवाचा विकास झाल्यामुळे आदिम अवस्थेचे रूपांतर झालेले असले तरी मानवी व्यवहाराच्या अनेक वैशिष्टयावरून असे दिसते की, आजही आदिकाळातील

अवशेष शिल्लक आहेत. रूढी-परंपरा, लोकविश्वास यातून आदिकालच्या अवशेषांचा प्रत्यय येतो.''[१]

याच बाबतीत विवेचन करताना विश्वनाथ शिंदे म्हणतात, ''भारतीय साहित्याचा इतिहास जितका प्राचीन आहे तितकाच नव्हे तर त्याहून अधिक प्राचीन काळापासून लोकसाहित्याची परंपरा चालत आलेली आहे. त्या त्या काळात अस्तित्वात असणाऱ्या लोकभाषेत मौखिक स्वरूपात लोकसाहित्य अस्तित्वात असले पाहिजे.''[२] यावरून लोकसाहित्याची परंपरा फार जुनी असून ती मौखिक रूपातच प्रचलित होती हे लक्षात येते. ''लोकसाहित्याची निर्मिती आदिम असते असे मानले जात असले तरी बदलत्या काळानुसार लोकसाहित्यात बदल होत असतो. बदलत्या समाजजीवनाचा संस्कृतीचा, घडामोडींचा अविष्कार लोकसाहित्यात झालेला असतो. त्यामुळे लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा आणि संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास ठरतो.''[३] तर लोकसाहित्याच्या उद्‌गमाबद्दल विश्वकवी रवींद्रनाथ टागोर म्हणतात, ''अत्यंत प्राचीन काळी भारतभूमीच्या आदीसंतांनी लोकसाहित्य व लोककला निर्माण करून देशाची उदात्त संस्कृती सिध्द केली आहे.''[४] डॉ. गंगाधर मोरजे म्हणतात, ''लोकसाहित्याच्या निर्मितीविषयी बोलताना ती अपौरूषेय, अनाम असते असे म्हटले जाते म्हणजे त्या साहित्याचा निर्माता आपणाला माहिती नसतो. काही अंशी ते खरेही असते. पण लोकसाहित्याचा शास्त्रीय अभ्यास करायचा तर असे होण्यामागील प्रक्रिया आपणाला समजावून घ्यावी लागते. कारण कर्त्याविना क्रिया घडणार नाही. त्यासाठी लोकसाहित्याच्या निर्मात्याचे अस्तित्व (नाम) पुसले जाण्यामागे कोणते रहस्य असते, त्याचा शोध घ्यावा लागतो.''[५]

लोकसाहित्याच्या विविध अभ्यासकांनाही लोकसाहित्याचा मूळचा कर्ता कसा नाममात्र होऊन लुप्त होतो याचा खरा शोध लागत नाही. परंतु लोकसाहित्याची निर्मिती फार जुनी आहे, प्राचीन आहे यावर तरी अनेकांचे एकमत झाले आहे.

## २) निर्मिती केव्हा झाली?

लोकसाहित्य प्राचीन असले तरी नव्या प्रवाहात नव्या अनुभूतीत तसेच वर्तमानातही ते नित्यनूतन भासत आहे कारण प्रत्येक लोकसाहित्य प्रकार नव्या मानवी समाजात प्रथम येतो तेव्हा नवीन लोक त्यामध्ये काही भर घालीत असतात यामुळे मूळच्या अर्थाचा तर भंग होत नाही उलट लोकसाहित्याला नवीन स्वरूप प्राप्त होत असते व मानवी जीवनाबरोबर जाता जाता, भूतकालीन मानवांचे दाखले देता देता लोकसाहित्य वर्तमानातही जगत असते. लोकसाहित्यामध्ये अनेक नव्या जुन्या बदलांना सामावून घेण्याची ताकत असते त्या संदर्भात डॉ. अनिल यांचे पुढील उद्गार उपयुक्त वाटतात. डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे म्हणतात, ''लोकसाहित्य हे मानवी जीवनाच्या सुरूवातीपासून मानवी जीवनाबरोबर नित्य प्रवाहित असलेले असते. ते असे मानवी जीवनप्रवाहाबरोबर वाहत येत असले तरी सदैव वर्तमानात असते. जीवनाच्या सर्व स्तरांतील अनुभूतीतून ते निर्माण होऊन प्रकट होत असते. व नवजीवनाला प्रेरणा देत असतानाच नवजीवनाला आपणात सामावून घेत पुन्हा-पुन्हा नित्य नव्याने प्रकट होतच असते.''[६]

या मतांवरून लोकसाहित्याची निर्मिती ही मानवी जीवनाच्या सुरूवातीपासूनच झाली आहे. मानवाच्या रानटी अवस्थेमध्ये तसेच त्यानंतरच्या काळात आपल्या मनातील विचार, भावना व्यक्त करण्याकरीता, मनोरंजनासाठी, रूढी-परंपरा सांगण्यासाठी त्याचे एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत संक्रमण करण्यासाठी लोकसाहित्यातील लोककथा, लोकगीते, लोककला, रूढी-परंपरा यांची निर्मिती झाली असावी असे म्हणता येईल.

आधुनिक साहित्याबाबत म्हटले तर प्रत्येक साहित्यकृतीला कर्ता हा एक व्यक्ती असतोच पण तोच दृष्टीकोन लोकसाहित्याकडे पाहताना ठेवला तर समोर प्रश्नच उभे राहतात. सुंदर कविता वाचल्यावर, कथा वाचल्यावर त्याचे लेखक कोण? असा प्रश्न आपण चटकन् विचारतो. आणि लोकसाहित्यातील ही अनोखी

दालने पाहिल्यावर हा प्रश्न पडल्याशिवाय रहात नाही. पाहाना इतकी सुंदर भाव-भावना, मनाची स्पंदने व्यक्त करणारी गीते, बोधात्मक कथा, लोकशिक्षणात्मक नाटीका जीवनाचे तत्वज्ञान सांगणाऱ्या म्हणी, वाक्प्रचार ऐकले की या सर्वांची निर्मिती कोणी केली असेल असा विचार मनात येतो आणि जे साहित्य आज हजारो वर्षानंतरही मानवी मनाला भुरळ पाडत आहे, त्यातील सौंदर्य माणसांना आकर्षित करत आहे त्याच्या अभ्यासाचीही गरज वाटते. अशा लोकसाहित्याच्या कर्त्याबाबत उत्सुकता ताणली जाते. याच उत्सुकतेतून पुढील अनेक विचारवंत, अभ्यासक, लोकसाहित्य विशारद, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, लेखक यांची मते समोर येतात ती पुढील प्रमाणे :-

## ३) लोकसाहित्याचा कर्ता कोण?

प्रभाकर मांडे म्हणतात की, ''लोकसाहित्य हे जाणीवपूर्वक निर्माण केलेले नसते तर ते सहजतया विकसित झालेले असते. त्यांचा स्वीकार व्यक्तीकडून होतो. त्यांच्याकडून ते उपयोजिले जाते. त्यात बदल होतात. त्याचे एकाकडून दुसऱ्याकडे संक्रमण होते. मात्र हे सगळे घडत असतात त्याची व्यक्तीविशिष्ठ प्रेरणा कुठेही नसते. लोकसाहित्याचे संपादन विकसन आणि संक्रमण हे स्वाभाविकपणे आणि सहजतया होत असते.''[७]

गंगाधर मोरजे म्हणतात की, ''लोकसाहित्याची निर्मिती होत असताना प्रारंभी कृती निर्माण करणारी एखादी व्यक्तीच असते. ती व्यक्ती सभोवतालच्या सांस्कृतिक व सामाजिक परिघाने बांधलेली असते. या निर्मितीची प्रक्रियाच अशी असते की, जेव्हा ही कलाकृती पूर्ण होते तेव्हा प्रारंभीच्या निर्मात्याच्या निर्मितीचा अल्पमात्र अंश त्या कलाकृतीत शिल्लक राहतो. किंवा संपूर्ण कलाकृती समूहाने आपली निर्मिती म्हणून आत्मसाद केलेली असते.''[८] मूळचा कर्ता एक असला तरी एकच व्यक्तीमन निर्मिती करत असले तरी ती निर्मिती समूहमनाची निर्मिती ठरते. मॅक ॲवार्ड लीच यांच्याही मते ''लोकसाहित्य हे मूलत: व्यक्तीने निर्माण केलेले

असते त्यामागे भावनांची प्रेरणा असल्यामुळे आणि लोकसमूहातील ऐक्यभाव त्यातून टिकविण्यात येत असल्यामुळे ते लोक समूहाने स्वीकारलेले असते.''[१] म्हणजेच लोकसाहित्य मौखिक वाङ्मय आहे ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केले जाते आणि मुख्य म्हणजे त्याचा कर्ता अज्ञात असतो व लोकसाहित्यातील प्रत्येक कलाकृती समूहाची असते. या वैशिष्टयांवर प्रकाश पडतो.

लोकसाहित्य किती प्राचीन आहे व त्याची निर्मिती कशी होते या मुख्य दोन प्रश्नांची उकल झाली आहे. यानंतर लोकसाहित्याची रूपरेखा पाहत असताना प्रथम लोकसाहित्य म्हणजे काय? त्याची व्याख्या, लोक व साहित्य यांच्या परिभाषा, लोकसाहित्य वर्गीकरण, लोकसाहित्याची अंगे, व्याप्ती, वैशिष्ठये या घटकांची माहिती घेत लोकगीतांपर्यंत येणार आहोत त्यानंतर लोकगीतांबाबत विस्तृत माहिती अभ्यासणार आहोत.

## ४) <u>लोकसाहित्य म्हणजे काय?</u>

याविषयी अनेक तज्ञ विचारवंतांनी काही लेखकांनी लोकसाहित्याविषयी काही सामान्य कल्पना सांगितल्या आहेत. या कल्पना म्हणजे लोकसाहित्याच्या शास्त्रशुध्द व्याख्या ठरू शकत नाही परंतु यावरून लोकसाहित्याची संकल्पना त्यामध्ये समाविष्ठ होणारे घटक व लोकसाहित्याची प्रदेश विशिष्टता स्पष्ट होते. त्या सर्व विचारांचे सार खालील प्रमाणे –

''लोकसाहित्य हे लोकमानसाचा व समाजजीवनाचा सहज झालेला अविष्कार असल्यामुळे ते समाजजीवनाचेही एक अविभाज्य अंग आहे.'' असे प्रभाकर मांडे 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह' या ग्रंथात आपल्या निवेदनात म्हणतात.

डॉ. शरद व्यवहारे म्हणतात की, ''पारंपारिक जीवन पध्दतीतील अनेक विशेषांचा सामावेश लोकसाहित्यात होतो. लोकमानसाच्या कृती–उक्ती म्हणजे लोकसाहित्य. लोकसाहित्यातून लोकजीवनाचा अविष्कार घडत असल्यामुळे त्या

जीवनातील मौखिक परंपरेने प्रचलित असलेल्या लोकवाङ्मयालाही एक आगळे वेगळे महत्व लोकजीवनाच्या संदर्भात असते.''[१०]

तारा भवाळकरांच्या मते, ''लोकसाहित्य हा लोकजीवनरीतीचा अविभाज्य भाग असतो. त्यामुळे लोकसाहित्यातील कोणत्याही घटकाची निर्मिती केवळ रंजनाच्या हेतूने झालेली असते. रंजन हा एक आनुषंगिक परिणाम असू शकतो. लोकसाहित्य हे लोकमानसाचे, लोकभावनांचे, लोकश्रध्दांचे, लोकधारणांचे व्यक्त रूप असते.''[११] तसेच लोकसाहित्य ही एक प्रवाही घटना आहे. अबोध समुहमनाच्या प्रेरणेतून लोकसाहित्य घडते असेही त्या म्हणतात.

डॉ. शरद व्यवहारे तर आपल्या शब्दातून, विचारातून लोकसाहित्याच्या संकल्पनेबरोबर त्याचे महत्त्वही स्पष्ट करतात. ते म्हणतात की, ''मराठीतील लोकसाहित्याचे दालन भव्य आणि दिव्य आहे. लोकगीते, लोककथा, उखाणे, म्हणी, लोकभ्रम इ. प्रकारची विविधता त्यात आहे. लोकसाहित्यातील कल्पना व भावसौंदर्य महाकाव्य लिहिणाऱ्या महाकवीच्या कल्पनेइतकी झेप लोकसाहित्यात पाहावयास मिळते. लोकसाहित्यातील विविध भावछटा मोहक असून हृदयस्पर्शी आहे. लोकसाहित्यातील प्रत्येक ओवी म्हणजे अनमोल मोती होय. लोकजीवनातून अविष्कृत झालेले आणि लोकजीवनात आनंद निर्माण करणारे असे हे अलिखित अक्षर वाङ्मय आपल्या देशाचे एक प्रकारचे मानधन आहे.''[१२]

अशा सुंदर शब्दांत त्यांनी लोकसाहित्याचा सन्मान करून त्याची गरज दर्शविली आहे. लोकसाहित्याची निर्मिती आगळी-वेगळी तर आहेच पण त्याबरोबरच भारतीय संस्कृती व जीवन यांचा तो एक प्रेरणा देणारा इतिहास आहे. तसेच प्रभावी लोकगाथाही आहे. गंगाधर मोरजे लोकसाहित्याबाबत एक वेगळाच विचार सांगतात, ते म्हणतात की, ''मी लोकसाहित्याला कला म्हणतो, तेव्हा ते विशिष्ट लोकसमूहाचे मनोरंजन व आल्हाद देण्याचे कार्य करते, ही जाणीव मला अभिप्रेत आहे. लोकसाहित्याच्या निर्मितीचे व आस्वादाचे प्रयोजन सारखे वा वेगळे असू शकेल पण

लोकसाहित्याचे प्रयोग सादर करणारा आपल्या परीने प्रयोग सजवून रंजक करीत असतो हे नाकारता येत नाही. त्याच्या परीने त्याची ती कलानिर्मिती असते. तसेच ज्या लोकसमुहासमोर ती सादर केली जाते तो समुहही 'कला' म्हणून त्या प्रयोगाचा आस्वाद घेत असतो.''[१३]

असे हे लोकसाहित्य अनेक कलागुणांनी नटलेले आहे. समाजाला आजही प्रेरक ठरणारे आहे. तसेच लोकसाहित्य हे समाज जीवनाचा इतिहास सांगणारी संस्कृतीवर्धक गाथा आहे असेही म्हटल्यास वावगे ठरणार नाही. लोकसाहित्य म्हणजे काय? याबद्दलच्या वरील मतमतांतरातून लोकसाहित्याचे मनोहारी, विशाल, कलात्मक, उपयुक्त असे रूप समोर येण्यास मदत होते.

लोकसाहित्याची व्याख्या पाहण्या अगोदर लोकसाहित्य ही संज्ञा व त्याचा अर्थ स्पष्ट करणे गरजेचे आहे.

## ५) <u>लोकसाहित्य संज्ञा व अर्थ</u> :-

लोकसाहित्य हा पारिभाषिक शब्द 'Folklore' या इंग्रजी शब्दासाठी वापरण्यात येतो. 'Folklore' हा शब्द सर्वप्रथम विलियम थॉम्स (William Thoms) यांनी वापरला. मराठी लोकसाहित्याच्या अभ्यासाला जेव्हापासून प्रारंभ झाला तेव्हापासून 'Folklore' साठी निरनिराळे शब्द सुचविण्यात आले. 'महाराष्ट्रात लोकसाहित्याचे संकलन आणि त्यासंबंधी लेखन १८५८ पासून सुरू झाले असले तरी निरनिराळ्या लोकसाहित्य प्रकारांना पारिभाषिक संज्ञा या १९१५ पासून वापरण्यात येऊ लागल्या. १९१६ पासूनच लोकसाहित्याच्या प्राणप्रतिष्ठेला प्रारंभ होतो. लोकसाहित्याच्या प्राणप्रतिष्ठेचे कार्य कै. वि.का. राजवाडे यांनी केले.'[१४] या पारिभाषिक संज्ञा वापरास सुरूवात झाल्यावर 'Folklore' साठी अधिकाधिक शब्द अनेक लोकसाहित्य विशारदांनी सांगितले ते पुढील प्रमाणे ङ्ग

**'Folklore' साठीचे पारिभाषिक शब्द** :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | द.वा. पोतदार | - | लोकविदया |
| २) | दुर्गा भागवत | - | लोकसाहित्य |
| ३) | रा.चि. ढेरे | - | लोकविदया |
| ४) | चि.ग. कर्वे | - | लोकविदया |
| ५) | गो.म. कालेलकर | - | लौकिक दंतकथा |
| ६) | हिंदीमध्ये | - | लोकवार्ता |
| ७) | पं. रामनरेश त्रिपाठी | - | Folk साठी ग्राम-ग्रामगीत |
| ८) | डॉ. सुनितकुमार चटर्जी | - | लोकायान |
| ९) | डॉ. कृष्णदेव उपाध्याय | - | लोकसंस्कृती |
| १०) | डॉ. वासुदेवशरण अग्रवाल | | लोकवार्ता |

असे विविध शब्द 'Folklore' साठी सुचविले गेले तरी प्रामुख्याने 'लोकसाहित्य' हाच शब्द रूढ झाला. त्याचबरोबर वि.का. राजवाड्यांनीच प्रथम 'लोकगीत' व 'लोककथा' हे दोन्ही शब्द वापरले पुढे तेच शब्द रूढ झाले. हे दोन्ही शब्द अनुक्रमे 'सज्जनगडावरचे एक लोकगीत' आणि 'सूर्यनारायणाची कहाणी व सूर्यव्रत' या लेखात हे शब्द वापरले.

**लोकसाहित्यातील 'लोक' व 'साहित्य' यांचे अर्थ** :-

लोकसाहित्य'लोक' व 'साहित्य' या दोन शब्दापासून बनलेले असून 'लोक'साठी 'Folk' हा शब्द तर 'साहित्य'साठी 'lore'हा शब्द वापरला जातो.

**'लोक' अर्थ** :-

१) 'महाराष्ट्र कोशात 'लोक' या शब्दाचे अनेक अर्थ दिले आहेत :- (अ) जन, मनुष्य, मानवलोक, समाज (ब) वर्ग, विशिष्ठ समाज, संघ, जात (क) राष्ट्र, देश, राज्य, प्रांत (ड) जगाचे, विश्वाचे भाग, लोकसाहित्य या शब्दात विशिष्ट समाज या अर्थाने 'लोक' शब्दाची योजना केलेली असते.'[१५]

२) भारतीय परंपरेनुसार लोक हा शब्द संस्कृतमधील 'लोक' या धातूपासून बनलेला असून त्याचा अर्थ पाहणारा, पाहण्याचे कार्य करणारा जनसमुदाय असा होतो. ऋग्वेदात 'लोक' याचा अर्थ 'जन' असा आहे. अशोकाच्या शिलालेखात 'लोक'चा व्यापक अर्थ आहे. तेथे 'लोक' म्हणजे समस्त प्रजा मात्र लोकसाहित्यातील लोक व्यापक अर्थाने वापरले जात नाही.

<u>लोकसाहित्यातील 'लोक' या पदाचा अर्थ</u> :-

१) काही लोकसाहित्य विशारद लोकसाहित्यातील 'लोक' या पदाचा अर्थ ग्रामीण समाज किंवा 'असाक्षर जनसमाज' असा करतात.

२) मारिया लीच यांच्यामते, लोक (Folk) म्हणजे ग्रामीण किंवा नागर भागात राहणारा असा जनसमूह ज्यांना त्याची स्वत:ची अशी निराळी परंपरा असते. स्वत:च्या सांस्कृतिक परंपरामुळे आणि पारंपारिक जीवन पध्दतीमुळे तो जनसमूह निराळा उमटून पडतो असा जनसमूह म्हणजे 'लोक' ''

३) ॲलन उंडेस यांच्या मते, 'लोक' म्हणजे दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्तींचा समूह, ज्यांच्यात वंश, भाषा, व्यवसाय किंवा धर्म यापैकी एक किंवा अधिक समान तत्वे असतात.''[१६]

४) 'लोक' या संज्ञेचा अर्थ सांगताना डॉ. तारा भवाळकर म्हणतात की, लोक केवळ ग्रामीण किंवा शहरी तसेच जुने किंवा नवे नाहीत. सांस्कृतीकदृष्टया विशिष्ट मानसिक जडण-घडणीचा सामावेश ज्या समाजात, ज्या समुहामध्ये आढळतो, असा भावसमूह म्हणजे लोक.''[१७]

५) गंगाधर मोरजे यांच्या मते, ''लोकसाहित्यातील लोक हा केवळ जाती भूगोल (प्रदेश) वगैरेंनी परिविष्ट समूह असतो असे नाही. विशिष्ट सौंदर्यदृष्टी, भाषा नीतीकल्पना आणि तत्वज्ञान या कमीत-कमी तत्वांनी एकत्र आलेला तो जनसमूह असतो.''[१८]

**लोकसाहित्यातील 'साहित्य' शब्दाचा अर्थ :-**

परंपरेने साहित्य म्हणजे काव्य, नाट्य, कथा इ. चा सामावेश ज्याच्यात होतो अशी वाङ्‌मय शाळा. पण लोकसाहित्यात 'साहित्य' हा शब्द वेगळ्या अर्थाने वापरला जातो. म्हणजेच यामध्ये सर्व कलांचा सामावेश होतो. थोडक्यात कथा, गाणी, उखाणे, म्हणी, रूढी, परंपरा, समजुती, शिल्पकला, चित्रकला वगैरे सर्व कला म्हणजे साहित्य होय. अशा व्यापक अर्थाने साहित्य हा शब्द वापरला जातो. यानंतरचा महत्त्वाचा भाग म्हणजे लोकसाहित्याच्या व्याख्या होय.

## ६) लोकसाहित्याची व्याख्या :-

लोकसाहित्याचा लोकांच्या जीवनात सामावेश झाल्यापासून लोकसाहित्याची व्याख्या करण्याचे प्रयत्न होऊ लागले. मात्र त्याची समाधानकारक व्याख्या अजूनही झाली नाही. लोकसाहित्याची वैशिष्टये, लक्षणे आपण सहजपणे सांगू शकू पण या सर्व लक्षणांना एका व्याख्येत बांधणे अजूनही शक्य झाले नाही तरीही अनेक लोकसाहित्य विशादरांनी लोकसाहित्याची व्याख्या करण्याचे प्रयत्न केले आहेत ते पुढील प्रमाणे :-

१) **जोनास बॅलिस :-**[१९]

यांच्या मते लोकसाहित्य हे आदिमान निर्मित असून परंपरागत असते. त्याचप्रमाणे सुसंस्कृत मानवाने देखील निर्मिलेले असते. ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्याद्वारा पदय किंवा गदय स्वरूपात केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकभ्रम, रूढी, लोककला प्रकार त्याचप्रमाणे नृत्य, नाट्य इत्यादींचा अंतर्भाव होतो. लोकसाहित्य हे लोकसमुहाच्या अविष्काराचे शास्त्र नाही, तर लोकसमूहाच्या परंपरागत चालत आलेल्या जीवनाच्या अविष्कारांचे शास्त्र आहे.

२) **मारियस बार्डो :-**

यांच्या मते, विविध व्यवसायांचे ज्ञान, अनुभूती, शहाणपण, कौशल्य, सवयी आणि रूढी तसेच व्यवहार यासंबंधीचे ज्ञान शब्दाने किंवा कृतीने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत जे चालत येते त्या सर्वास लोकसाहित्य म्हणावे.

३) **बिलियम आर. बॅक्सम :-**

यांच्या मते, लोकसाहित्य म्हणजे मिथ्स, म्हणी, लोकगीते आणि अशा प्रकारे भाषेच्या माध्यमातून अभिव्यक्त होणारे पारंपारिक कलात्मक अविष्कार.

४) **बॉटकिन :-**

विशुध्द मौखिक किंवा अलिखित संस्कृतीत सर्वकाही लोकसाहित्यच असते असे बी.ए. बॉटकिन यांनी म्हटले आहे.

५) **स्विनोझा :-**

ऑरेलियो एम्. स्पिनोझा यांनी लोकसाहित्य किंवा लौकिक ज्ञान हे मानवाने युगानुयुगे घेतलेल्या अनुभवांचे आणि शिक्षणाचे साररूप असते असे म्हटले आहे.

६) **फॉस्टर :-**

यांच्या मते, लोकसाहित्य हा शब्द लवचिक असून त्यात लोकसमुहाच्या अलिखित किंवा मौखिक स्वरूपाच्या भाषाविष्कारांचा सामावेश होतो.

७) **गास्टर :-**

लोकसाहित्य हे लोकांच्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक असून तो लोकांकडून विचारपूर्वक किंवा अजाणता संरक्षिला जातो. लोकसाहित्य हे लौकिक परंपरांचा निधी असते. लोकजीवनाचा सर्वसंग्राहक असा घटक असते. लोकसाहित्य हे कला व वाङ्मय यांचा स्त्रोत असते.

८) आर.डी. जेम्सन :-

लोकसाहित्य ही सांस्कृतिक मानववंश शास्त्राची एक शाखा आहे असे अनेक लोकसाहित्य विशादरांप्रमाणेच आर.डी.जेम्सन यांचे मत आहे.

९) कुराथ :-

गटर्यूर्ड पी. कुराथ यांनी लोकसाहित्य ही प्रामुख्याने सामुहिक निर्मिती असून परंपरेने चालत आलेली असते असे म्हटले आहे.

१०) फ्रान्सिस पॉटर :-

प्राचीन समाजजीवनाचे अविनाशी अवशेष म्हणजे लोकसाहित्य असे चार्लस फ्रान्सिस पॉटर यांनी म्हटले आहे.

११) स्मिथ :-

मरियन डब्ल्यू. स्मिथ यांच्या मते लोकसमूहाचे पारंपारिक जीवन यालाच व्यापक अर्थाने लोकसाहित्य म्हणता येईल.

१२) आर्चर टायलर यांनी सांगितलेली लक्षणे :-

''लोकसाहित्य हे एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत परंपरेने चालत आलेले असे साहित्य असते ज्याचा निर्माता अज्ञात असतो. म्हणी, कथागीते आणि इतर काही लोकसाहित्यप्रकार कुणीतरी व्यक्तीने निर्माण केले असले तरी त्याच्या संबंधी निश्चित अशी माहिती नसते. एखादया वेळी एखादया कृतीच्या लेखकाचे नाव समजले नाही तरीही त्याने निर्माण केलेल्या साहित्यात आदान-प्रदानाच्या प्रक्रियेमुळे खूपच बदल झालेले असतात. ती निर्मिती कुणी एका व्यक्तीची न राहता तिला लोकसमूहाच्या निर्मितीचे स्वरूप प्राप्त होते. अनेकांच्या सहकार्याने त्याचे स्वरूप सिध्द झालेले असते. ती कुणा एका व्यक्तीची तर्कपध्दती नसते. किंबहुना त्यात तर्काला विशेष असे स्थानच नसते. अशा स्वरूपाचे विचार आर्चर टायलर यांनी लोकसाहित्याची लक्षणे सांगताना व्यक्त केले आहेत.''

१३) सरोजिनी बाबर :-

"विविध प्रकारांच्या जातीवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षांमागे रचले असतानाही केवळ पाठांतरच्या बळावर पिढयान् पिढ्या आपल्या नवनवोन्मेशालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत हे लोकगीत म्हणजे सामान्य माणसाच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती होय."

वरील सर्व लोकसाहित्य विशारदांच्या व्याख्या त्यातील विवेचन आणि टायलर यांनी सांगितलेली लक्षणे पाहिली की लोकसाहित्याची बरीच लक्षणे समोर येतात ती पुढील प्रमाणे -

## ७) लोकसाहित्याची लक्षणे :-

१) लोकसाहित्य मौखिक किंवा अलिखित स्वरूपात असते.

२) ते एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत याप्रमाणे चालते.

३) पारंपारिकता हा लोकसाहित्याचा एक महत्वाचा विशेष असतो.

४) पूर्वकालीन संस्कृतीच्या अवशेष रूपाने ते समाजजीवनात प्रचलित आहे. हे संस्कृतीचे किंवा पूर्वकालीन जीवनाचे अवशेष असले तरी मृत अवशेष नसतात तर वर्तमानकालिन जीवनाच्या संदर्भात त्याला अर्थपूर्णता असते. त्यामुळेच या अवशेषांना सजीव अवशेष मानण्यात येते.

५) ते लोकसमुहाचे किंवा समाजगटाचे असते. ती समुहाची निर्मिती असते. व्यक्तीने निर्माण केलेले असले तरी त्याला असे स्वरूप प्राप्त होते की, ती व्यक्तीची निर्मिती न राहता सर्व समुहाची बनते. त्याचा मूळ निर्माता हा अज्ञात असतो. व्यक्तीचे व्यक्तिविशिष्ठत्व त्यात व्यक्त न होता समूहविशिष्टत्व व्यक्त होते.

६) लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचा अविष्कार होतो त्यामुळे ते लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे एक महत्त्वपूर्ण साधन असते. मौखिक संस्कृतीत सर्व काही लोकसाहित्यच असते.

७) लोकसाहित्य हे लोकमानसाचा अविष्कार असते.

८) लोकसाहित्य हे भौतिक किंवा मनोमय स्वरूपात असते.

९) लोकसाहित्यातून परंपरा टिकविणे आणि पुनरूज्जीवित करणे या क्रिया घडतात. त्यात पारंपारिकता आणि परिवर्तनशीलता असते.

१०) लोकसाहित्य हे लोकसमूहाच्या भ्रमातून किंवा आभाससृष्टीतून निर्माण झालेले असते.

११) लोकसाहित्य हे लौकिक ज्ञान असते. ते मानवाने युगानुयुगे घेतलेल्या अनुभवांचे साररूप असते. ते पारंपारिक ज्ञान असते.

१२) लोकसाहित्य हे कला, वाङ्मय यांचे स्त्रोत असते.

१३) लोकसाहित्याचे संपादन, विकसन आणि एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंतचे संक्रमण स्वाभाविकपणे होत असते.

१४) लोकसाहित्याच्या अभ्यासाचा सामावेशही लोकसाहित्यात होतो. इतिहासात ज्याप्रमाणे सामग्री आणि त्याचे अध्ययन या दोहोंचा सामावेश असतो त्याप्रमाणे लोकसाहित्य या संकल्पनेत पारंपारिक लोकजीवनाचा विविध माध्यमातून झालेला अविष्कार आणि त्याचे अध्ययन सामग्री आणि अध्ययन या दोहोंना लोकसाहित्य असे म्हणतात.''[२०]

## ८) लोकसाहित्याचे प्रयोजन :-

''लोकसाहित्याची व्याख्या करणे तसेच त्याचा उगम शोधणे इ. प्रश्नांपेक्षा ज्या समाजात ते प्रचलित असते त्या समाजातील घटकव्यक्तींनाही त्याची निर्मिती कुणी केली, त्याचे स्वरूप काय इ. प्रश्नांत रस नसतो. मात्र लोकसाहित्याच्या कार्याविषयी त्यांना पूर्ण जाणीव असते. अंगाईगीत म्हणून बाळाला झोपविणाऱ्या

आईला ते गीत कुणी, केव्हा रचले, त्यात कोणकोणत्या कल्पना ग्रंथित केलेल्या आहेत इ. प्रश्नांशी काहीही कर्तव्य नसते. ते गाणे म्हटल्याने बाळ झोपते अशी तीची कल्पना असते. जोपर्यंत तिला बाळाला झोपविण्याच्या कामी त्या गाण्याचे साहाय्य होते असे वाटेल तोपर्यंत ती गाणे म्हणत राहणार व ज्यावेळी गाण्याचा उपयोग होत नाही असे वाटेल त्यावेळी अन्य उपाय शोधणार. अशीच स्थिती इतर लोकसाहित्य प्रकारांचीही असते. त्यामुळेच ते प्रचलित असते, जिवंत असते. समाजजीवनात प्रचलित असलेल्या निरनिराळ्या लोकसाहित्य प्रकारांकडून विशिष्ट कार्य पार पाडले जाते. म्हणून लोकसाहित्य त्या समाजजीवनाचे अंग म्हणून त्यांच्यात जिवंत राहते.''[२१]

लोकसाहित्याचे समाजजीवनात प्रस्थापित झालेले अस्तित्वाचे प्रयोजन काय? यासंबंधी विचार करताना एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे लोकसाहित्याची निर्मिती कोणतेही उद्दिष्ट समोर ठेवून झालेली नसते तर सहजपणे झालेली निर्मिती असते. दैनंदिन जीवनात लोकसाहित्याचा उपयोग काय? किंवा त्याचे स्थान काय? याच्या विचारातून लोकसाहित्याचा समाजजीवनात प्रचलित राहण्याचा हेतू लक्षात येतो. लोकसाहित्याकडून पुढील कार्ये पार पाडली जात असल्याने लोकसाहित्याची गरज निर्माण झाली आहे. म्हणूनच लोकसाहित्याच्या अभ्यासासही प्राधान्य मिळत आहे.

१) लोकसाहित्यातून समुहभावाची निर्मिती होते.

२) लोकसाहित्यामुळे समाजात एकरूपता असते. तसेच समाजात सातत्यही असते.

३) व्यक्तीला लोकसमूहाचे संचित प्राप्त होते.

४) लोकसाहित्यातून समाजाच्या नीतिकल्पना व्यक्त होत असल्याने ते नीतिशिक्षणाचे माध्यम ठरते.

५) समाजामध्ये परंपरेने चालत आलेल्या सामाजिक संस्थांना लोकसाहित्याद्वारे समर्थन लाभते.

६) समाजाला वळण देण्याचे कार्य लोकसाहित्याकडून होत असल्याने प्रचाराचे माध्यम म्हणून त्याचा उपयोग होतो.

७) लोकसाहित्यातून स्वप्नरंजन होत असते त्यामुळे माणूस कधी-कधी वास्तवापासून दूर जातो. आपल्या दु:खापासून दूर होऊन त्याचा विसर पाडण्यासही मदत होते.

८) आबालवृध्द या सर्वांसाठी लोकसाहित्य आनंददायी ठरत असते.

९) लोकसाहित्यातून मनोरंजनही होत असते.

१०) समाजजीवनात प्रचलित असणाऱ्या विधींची माहिती होते.महत्व समजते.

११) समाजाची भौतिक गरज म्हणजेच विविध व्यवसायांचे ज्ञान, कला, कौशल्ये एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सोपविली जातात.

१२) लोकसाहित्य अनेक कलाप्रकारांची गंगोत्री आहे.

अशा प्रकारे लोकसाहित्यामुळे मानवी जीवन सुकर झाले आहे. हेच प्रयोजन असल्यामुळे लोकसाहित्याचा समाजजीवनाति सामावेश होत असेल.

## ९) <u>लोकसाहित्याची व्याप्ती</u> :-

लोकसाहित्याच्या व्याप्तीचा विचार करता लोकसाहित्यात विविध कला, कौशल्ये तसेच अनेक घटक सामाविष्ट होतात. हे सर्व घटक प्रामुख्याने चार भागात विभागले जातात.

१) <u>मौखिक परंपरा</u> :-

यामध्ये लोककथा लोकगीते यामध्ये सर्व प्रकारच्या कथा व सर्व प्रकारची लोकगीते यांचा सामावेश होतो या प्रकारांना लोकसाहित्याचा गाभा समजला जातो.

२) भौतिक संस्कृती :-

यामध्ये विविध प्रकारची कला, कौशल्ये, व्यवसाय, हस्तव्यवसाय उदा. शेती करण्याची पध्दत, मातीची भांडी करण्याचे कौशल्य, चपला तयार करण्याचे कौशल्य या सर्वांचा सामावेश होतो.

३) लोकरूढी, विधी, समजुती इ. :-

बऱ्याच गोष्टीसंबंधी प्रचलित असलेले लोकभ्रम, रूढी, समजुती कौटुंबिक तसेच सामाजिक पातळीवर जोपासल्या जातात. उदा. लग्न, बारसे, पूजा, बळी देणे, नवस बोलणे या सर्व गोष्टी या रूढींच्या नावावर केल्या जातात. इच्छापूर्ती करून घेण्यासाठी अशा रूढी-समजुती जोपासल्या जातात. या रूढी म्हणजे लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भागच होय.

४) प्रयोगसिध्द लोककला :-

ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग म्हणजे या लोककला देखील आहेत. यामध्ये संगीत, नृत्य, नाट्य, रांगोळी, चित्रकला, मूर्ती बनविणे, लाकडीकाम, नृत्याचे, संगीताचे प्रकार अशा विविध प्रयोगरूप लोककलांचा सामावेश होतो.

वरील चारही प्रकारात सामाविष्ट केलेल्या सर्व गोष्टींचा सामावेश लोकसाहित्यात केला जातो त्यामुळे लोकसाहित्याची व्याप्ती विशाल आहे यात शंका नाही.

## १०) लोकसाहित्याचा अभ्यास :-

लोकसाहित्याचे संकलन आणि अभ्यास याला १८ व्या शतकात युरोपमध्ये प्रारंभ झाला. ही सुरूवात प्रथम युरोपमध्ये झाली तरी त्याच्या आधीपासून लोकसाहित्य भारतातही अस्तित्वात होते. संकलन आणि अभ्यास १८ व्या शतकात पण त्यापूर्वी म्हणजेच १७ व्या शतकातही बरेच संकलन झाले होते. याच दरम्यान जी औदयोगिक क्रांती झाली त्यामुळे उदयोगधंदे वाढले, यांत्रिकीकरण झाल्याने मनोरंजनाची गरज वाटू लागली. अनेक उदयाला आलेल्या शहरांमध्ये ही स्थिती

होती. मात्र ग्रामीण भागातील चित्र वेगळे होते. ग्रामीण भागात पारंपारिक गीते, कथा यांचे प्रचलन होते. ग्रामीण लोकांबरोबर शहरी लोकही या मनोरंजनात्मक साधनाकडे वळू लागले. कवी, लेखक यांच्याबरोबर सामान्य माणूसही याकडे येऊ लागला. काही सामान्यांनी त्याचा केवळ मनोरंजनासाठी वापर केला. मात्र काही चिकित्सक व अभ्यासू व्यक्तींनी हे अमूल्य लेणे आहे या दृष्टीनेच त्याकडे पाहिले. त्यांच्या या दृष्टीतूनच लोकसाहित्याच्या अभ्यासाला चालना मिळाली. रूसोच्या 'Social Contract' या ग्रंथामुळे मनोरंजनाची आवड व गरज निर्माण झाली. 'Gentleman's Magazine' या नियतकालिकात पुराणपरंपरेचे संकलन झाले. जेरम्म ब्रिटन यांनी १८८१ साली, थॉमस ब्राऊन यांनी १६४६ वेगवेगळ्या संकलनास प्रारंभ केला. जॉन ऑब्रे यांनी १९९६ मध्ये 'Miscellenies' या ग्रंथात पुराणपरंपरा यांचे संकलन केले. रेव्हरेड ब्राऊन यांनी 'Antiquities of the Common People' हा ग्रंथ संपादित केला तर जॉन ब्रँड यांनी १९७७ मध्ये 'Observations on the popular Antiquities of the Great Britain' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत लोकरूढींचे समाजजीवनातील महत्व स्पष्ट केले तसेच इंग्लंडमधील साहित्याचे संकलन केले. अशा संकलनास प्रारंभ झाला नाही तरी लोकसाहित्याच्या शास्त्रीय अभ्यासाचा प्रारंभ करण्याचे श्रेय जर्मनमधील ग्रीमबंधू यांना देण्यात येते. जेकबग्रीम आणि विल्हेम ग्रीम या दोघा भावांचा जगप्रसिध्द ग्रंथाचा पहिला भाग 'Die Kinder & Hausmaershen' (मुलांच्या आणि घरगुती कथा) १८१२ साली प्रसिध्द झाला. तसेच त्यांनी अनेक ग्रंथ लिहून लोकसाहित्याच्या क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केली.

एकूणच निष्कर्ष काढला तर १७ व्या आणि १८ व्या शतकात लोकसाहित्याच्या संकलनास व नंतर अभ्यासास प्रारंभ झाला.

भारतामध्ये ही लोकसाहित्याची परंपरा फार प्राचीन आहे. आपल्याकडे बरेच साहित्य प्रवाह इतर देशातून आयात झाले आहेत मात्र लोकसाहित्याच्या बाबतीत असे म्हणता येणार नाही. डॉ. तारा भवाळकर या संदर्भात म्हणतात की, ''भारतात

लोकसाहित्याचा अभ्यास खऱ्या अर्थाने १९ व्या शतकाच्या अखेरीस --- खरे तर २० व्या शतकाच्या प्रथम पर्वात सुरू झाला. आपल्याकडे जसे सगळेच आधुनिक अभ्यासप्रवाह पश्चिमेकडून आयात झाले तसा लोकसाहित्याचा अभ्यासप्रवाहही आधुनिक काळात पश्चिमेकडून मोठ्या प्रमाणावर आयात झालेला आहे. याचा अर्थ असा नव्हे की, 'लोकसाहित्य' हीच आयात आहे. वस्तुत: लोकसाहित्य दृष्ट्या भारत ही अतिशय संपन्न भूमी आहे. मात्र त्याच्या पध्दतशीर अभ्यासाची कल्पना आणि प्रारंभ मात्र इंग्रजोत्तर काळात २० व्या शतकाच्या आरंभी भारतात झाल.''[२२]

भारतात लोकसाहित्याचा अभ्यास सुरू झाला पण तो मुख्यत: इंग्रजांच्या आगमनामुळे जिज्ञासू, अभ्यासू, चिकित्सक आणि हुशार इंग्रजांनी आपल्या फायदयासाठी लोकसाहित्याचा अभ्यास केला. कारण भारतावर राज्य करण्यासाठी तेथील लोकजीवन, समाजजीवन यांची माहिती त्यांना हवी होती त्यासाठी इंग्रज प्रशासक व ख्रिस्ती मिशनरी यांनी पुढाकार घेतला हे आता सर्वमान्य आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासक दुर्गा भागवतही 'लोकसाहित्याची रूपरेखा' यामध्ये म्हणतात की, ''भारतात लोकसाहित्याच्या अभ्यासाला चालना भारतीय विदयेच्या (Indology) अनुषंगाने मिळाली. भारतीय विदयेच्या अभ्यासाचा उगम ब्रिटीश साम्राज्याच्या स्थापनेत आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.''[२३]

भारतात लोकसाहित्यासंबंधी महत्वपूर्ण काम करण्यामध्ये पहिले पाश्चात्य अभ्यासक कर्नल जेम्स होते. त्यानंतर कर्नल टॉड –Annals & Antiquities of Rajasthan - १९२९

जे एबर – पंजाबी लोकगीते १८५४

सर रिचर्ड टेंपल – मध्यप्रदेशीय वन्य जमाती अभ्यास – १८६६

मिस मेरी फियर – द. भारतातील लोककथा – १८५८

चार्लस् ई. गोवर – भारतीय लोकगीत संग्रह (मा.का.)

डाल्टन – बंगालमधील जमातीसंबंधी माहिती – १८७२.

आर.सी. कॉलवेल - तामिळ भाषेतील लोकगीते -१८७२

अशा अनेक संकलनकारांची नावे देता येतील. येथे मात्र संक्षिप्त रूपात देण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी लोकसाहित्याच्या (महाराष्ट्रातील) संकलनास गेल्या शतकात प्रारंभ झाला. मेरीफ्रियर हिने - १८५८ मध्ये यामध्ये लोककथा, दंतकथा प्रसिध्द केल्या. मेरी फ्रियर यांच्या प्रयत्नानंतर सदाशिव काशिनाथ छत्रे, राजारामशास्त्री भागवत, विष्णुशास्त्री चिपळूणकर, महादेव मोरेश्वर कुंठे, काशिनाथ वामन लेले इ. विद्वानांनी लोकगीतांच्या संकलनाचा प्रयत्न केला. त्यानंतर

राजारामशास्त्री मायवत - गोंडी भाषा व गीते - १८७७

श्री. नवरे महाराष्ट्र साहित्य पत्रिकेत म्हणी प्रसिध्द - १९२५ पासून

कै. वि.का. राजवाडे लोकगीते, लोककथा, शब्दरूढ १९२५

शं.गो. दाते लोककथा पुस्तक - १९३०

साने गुरूजी स्त्रीजीवन पुस्तक - १९३०

डॉ. कमलाबाई देशपांडे अपौरूषेय वाङ्मय - १९४४

वामन चोरघडे, काका कालेलकर - साहित्याचे मूलधन

पां. श्री. गोरे वऱ्हाडी लोकगीते

वि.ग. भिडे - श्रावणसरी, मोत्याचे कणीस

डॉ. नांदापूरकर - विदर्भ, खानदेश, मराठवाड्यातील लोकगीते, माहेरचे मराठी,

मराठीचा मोहोर, मराठीची माया-मराठवाड्यातील स्त्रीगीते

डॉ. सरोजिनी बाबर - मराठीतील स्त्रीधन, बाळराज, जा माझ्या माहेरा, एक होता राजा,जनलोकांचा सामवेद.

गुरूदेव टागोर - लोकसाहित्य बंगाली पुस्तक

अशा अनेक ग्रंथकारांचा परामर्श घेता येईल. पण यांच्या ग्रंथसंपदेमुळे मराठी लोकसाहित्यावर मात्र फारच प्रकाश पाडला आहे.

## ११) लोकसाहित्याचे वर्गीकरण :-

लोकसाहित्याची व्याख्या, व्याप्ती, लक्षणे, प्रयोजन, अभ्यास या गोष्टी पाहिल्यानंतर गरज वाटते ती लोकसाहित्याच्या वर्गीकरणाची की ज्यातून लोकसाहित्यामध्ये समाविष्ट होणारे अनेक घटकांची, प्रकारांची माहिती मिळण्यास मदत होते. लोकसाहित्याचा अभ्यास अनेकजण, अनेक पध्दतीने करतात त्यामुळे त्याच्या संशोधनाबाबत विविध मते दिसून येतात. वर्गीकरणातही हेच घडले आहे.

<u>वर्गीकरणाचे प्रकार</u> :-

१) ''ज्यात सर्व पारंपारिक जीवन विशेषांचा अंतर्भाव करता येईल असे स्थूल वर्गीकरण पुढील प्रमाणे :-

१. अभिव्यक्ती - याचे दोन विभाग केले जातात.

अ) शब्दमाध्यमातून झालेली अभिव्यक्ती - लोककथा, लोकगीते, लोककथागीते, म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, प्रहेलिका इ.

आ) शारीर अभिव्यक्ती - लोकनृत्य, नोकनाट्य, नृत्यखेळ, स्त्री पुरुशांचे पारंपारिक खेळ इ.

२. रूढी, विधी, सण, उत्सव, व्रत, नवससायास इ.

३. यातुसंबंधी समजुती, लोकविश्वास, लोकभ्रम, यंत्रतंत्रादिकासंबंधीचा विश्वास, लोकवैदयक इ.

वरील वर्गीकरण स्थूल असून सर्वसमावेशक आहे.''

२) प्रभाकर मांडे आणखी एका प्रकारे लोकवाङ्मयाचे वर्गीकरण करतात. हे वर्गीकरण करून पुन्हा या लोकवाङ्मयाच्या प्रकारात उपप्रकार मांडता येतात. ते स्वरूप विश्लेषणाच्या दृष्टीने सोयीचे होते.




३) डॉ. कमलाबाई देशपांडे यांनी आपल्या 'अपौरूषेय वाङ्मय' पुस्तकात केलेले वर्गीकरण




अशा वर्गीकरणातून सर्व प्रकार समोर येत नाहीत काही घटकांना महत्व तर काही घटक दुर्लक्षित राहतात त्यामुळे हे परिपूर्ण वर्गीकरण होऊ शकत नाही.

लोकसाहित्याच्या वर्गीकरणातून लोकसाहित्यातील घटक समोर येतात. हे घटक कोणते तर लोकनृत्य, लोककथा, लोककथागीते, लौकीक गीते व लोकगीते हे होय. पहिल्या चार घटक प्रकारांची संक्षिप्त माहिती घेऊन मुख्य घटक लोकगीते याचा विस्तृत रूपात विचार करणार आहे.

## १) लोकनृत्य :-

लोकनृत्याला लोकसाहित्याचे कलात्मक दालन म्हटले जाते. याचाही उगम आदीम संस्कृतीपर्यंत पोहोचतो. या लोकनृत्यांनाही फार मोठी प्राचीन परंपरा आहे. सुख-दु:ख, राग, द्वेष, आनंद या भावना व्यक्त करण्याच्या हेतूने लोकनृत्य जन्मले असावे असे मानतात. माणूस प्राण्यापासून विशेषत: मोरापासून नृत्य करण्यास

शिकला अशी भिल्लांची समजूत आहे. तसेच लोकनृत्य शिवापासून उत्पन्न झाले असावे असे मत मांडले जाते.

भावना व्यक्त करणे हा लोकनृत्याचा मूळ हेतू आहेत. त्याबरोबर श्रमपरिहार व मनोरंजनाचाही हेतू आहे. यातून समूह मनाचाही अविष्कार होतो. यामुळेही समाजजीवनाचे स्वरूप कळण्यास मदत होते.

व्याख्या :- कोणत्याही जीवनहेतू शिवाय केलेली अवयवांची लयबध्द हालचाल जिचा जन्म भावनावेगातून होतो व या हालचालीतून त्यांचाच अविष्कार होतो.'' यावरून लोकनृत्ये काही हेतूंनी निर्माण झाली असे म्हणण्यापेक्षा काही प्रसंगांनी निर्माण झाली असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. त्यापासून मनोरंजनही होते. लोकनृत्याविषयी लिहिताना र.वा. दिघे लिहतात – ''दिवसभराच्या थकव्यानंतरही रात्रभर नाचण्याने आदिवासींना श्रम होत नाहीत, उलट विसावाच मिळतो. कारण कंपयुक्त हालचालींनी मास आणि स्नायू थलथलवले महणजे स्नायू आणि मज्ञातंतू यांना एक प्रकारची झोप मिळते. नृत्य म्हणजे फुकट व सोपं अस मर्दन किंवा मालिश होय.''[२६]

<u>लोकनृत्याचे काही प्रकार</u> :-

१) प्रियाराधन नृत्य, २) कृषी नृत्ये, ३) युध्द नृत्ये, ४) धार्मिक नृत्य, ५) जादू-नृत्ये, ८) सामुदायिक नृत्ये वगैरे.

<u>लोकनृत्याची प्रयोजने</u> :-

१) पीक चांगले यावे, २) विष उतरण्यासाठी, ३) शिकारीत यश येणे, ४) शत्रूचा पराभव होणे, ५) झाडांना फळे यावीत, ६) पाऊस पडावा, ७) प्रेम व्यक्त करण्यासाठी, ८) मनोरंजनासाठी अशा विविध कारणांसाठी लोकनृत्य सादर केले जाते. यामध्ये स्त्रियांची, पुरूषांची लोकनृत्ये वेगवेगळी असतात. या घटकांवरून लोकनृत्याविषयी अल्पशी माहिती उपलब्ध होते.

## २)  लोककथा :-

लोकगीतांप्रमाणेच लोककथेचा विस्तार फार मोठा आहे. तसेच अतिप्राचीनही आहे. प्राचीन काळातही मोठ्या प्रमाणात लोककथा अस्तित्वात असलेल्या दिसतात. लोककथांचा जन्म भारतात झाला आहे असेही काही संशोधकांचे मत आहे. आदिमांच्या वस्तीमध्ये लोककथा अस्तित्वात होत्या. मानव हा गोष्टीवेल्हाळ आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनाच कथेचे आकर्षण वाटत असते. प्राचीन काळातच नव्हे तर आजच्या आधुनिक काळातही कथा ऐकण्यास सर्वजण उत्सुक असतात. यावरून लोककथांची आवड लक्षात येते.

लोककथा निर्मितीच्या पाच अवस्था डॉ. सत्येंद्र यांनी सांगितल्या आहेत.

१) आदिम कालीन मानवाने निसर्गाचा आपल्यापरीने अर्थ लावला त्याच्या स्पष्टीकरणातून कथा जन्मल्या.

२) २ ऱ्या अवस्थेत धर्मभावना व श्रध्दा यांची जोड

३) ३ ऱ्या अवस्थेत कथांचा वापर धर्म, मनोरंजन, नीतिशिक्षण यासाठी होऊन कथेने स्वतंत्र अस्तित्व सिध्द केले.

४) ४ थ्या अवस्थेत भाषा व प्रदेशानुसार कथा बदलू लागली.

५) कथा समाजजीवनाशी एकरूप होऊन समाजदर्शन घडवू लागली.

**<u>लोककथेचे वर्गीकरण</u> :-**

लोककथेचे वर्गीकरण करण्याचे प्रयत्न प्राचीन काळी देखील झाले होते. 'दिर्घनिकाय' या लोककथा विशारदाने केलेले वर्गीकरण पुढील प्रमाणे :-

१) राजकथा, २) चोरकथा, ३) महामात्रकथा, ४) सेनाकथा, ५) भयकथा, ६) युध्दकथा, ७) अन्नकथा, ८) पानकथा, ९) वस्त्रकथा, १०) शयनकथा, ११) मालाकथा, १२) गंधकथा, १३) ज्ञातिकथा, १४) यानकथा, १५) ग्रामकथा, १६) निगम कथा, १७) नगर कथा, १८) जनपद कथा, १९) स्त्रीकथा, २०) पुरूषकथा, २१) शूरकथा २२) विशाखा कथा

(बाजारातील गप्पा) २३) अद्‌भूत कथा, २४) पूर्वप्रेत कथा, २५) निरर्थक कथा, २६) लोकआख्यायिका, २७) समुद्राख्यायिका इ.[२७]

आधुनिक अभ्यासक्रांती म्हणजे डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. शरद व्यवहारे, डॉ. सत्येंद्र (हिंदी अभ्यासक) वगैरेंनी वर्गीकरणाचे प्रयत्न केले आहेत. तरीही त्यामध्ये काही त्रुटी राहतातच.

**लोककथेची वैशिष्टये :-**

१) मनोरंजन व प्रबोधन हा उद्देश लोककथेमागे आहे.

२) यामध्ये अद्‌भुतरम्यता असते.

३) लोककथेची भाषा लोकभाषा असते.

४) निसर्गाचे चित्रणही या लोककथेत असते.

५) लोककथेतून समूहमनाचे दर्शन घडते.

६) लोककथांचे स्वरूप मौखिक असून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतात. या कथांचा संबंध धर्म व विधींशी जोडला जातो.

७) लोककथेत अद्‌भूत मानव, पशू, पक्षी आढळतात.

८) लोककथेत निवेदकाला महत्त्व असते.

या घटकांबरोबर कथांचे अनेक प्रकार आहेत. दैवकथा, उत्पत्तीकथा, दंतकथा, प्राणिकथा किंवा बोधकथा, अद्‌भुत कथा (परिकथा), हास्यकथा, चातुर्यकथा अशा विविध प्रकारांत लोककथा सांगितल्या जातात. या सर्वांवरून लोकथेचे स्वरूप लक्षात येण्यास मदत होते.

## ३) लोककथागीत :-

लोककथागीतांची परंपरा प्राचीन आहे. अगदी आदिम काळापासूनची आहे असेही म्हणता येईल. लोकगीतांचा उगम झाल्यानंतर काही काळातच लोककथागीतांचा उगम झाला. सर्वात आधी नृत्य उदयास आले. नृत्याला साथ म्हणून लोकगीत उगम पावले व त्या नृत्यगीतांना आकर्षकपणा आणण्यासाठी,

इतरांना आकर्षित करण्यासाठी म्हणून लोककथागीते जन्माला आली असावीत. या लोककथागीतांमध्ये पारंपारिक देवदेवतांविषयक, भगतांविषयी, कौटुंबिक प्रसंगविषयक कथा गुंफल्या जातात. या कथागीतांना गीताबरोबर चाली लावून अनोख्या ढंगात ती सादर केली जात. त्यामुळे मनोरंजनाबरोबर ज्ञानवृध्दीही होण्यास मदत होई. अशा स्वरूपाची ही लोककथागीते आहेत. त्यांची काही स्वरूप वैशिष्टये पुढील प्रमाणे :-

१. लोककथागीते मौखिक रूपात संक्रमित होतात.

२. नृत्य, गीत आणि कथा यांपासून कथागीतांचा उगम झाला.

३. सामूहिकता हा विशेष आहे.

४. मनोरंजनातून उद्‌बोधन होते.

५. प्रारंभ, मध्य, शेवट अशा ३ अवस्था यात असतात.

६. कथागीते गेय असतात, कर्ता अज्ञात असतो.

७. ही कथागीते साधी असतात.

८. भाषा लोकभाषा असते.

''महाराष्ट्रात लोककथांचे स्वरूप विविध असे आहे. आशय, स्वरूप आणि म्हणणाऱ्या व्यक्ती इ. घटकांच्या आधारे त्यांचे वर्गीकरण करता येऊ शकेल. ते पुढील प्रमाणे

वर्गीकरण :- १) कौटुंबिक आणि सामाजिक कथागीते

२) पौराणिक कथागीते

३) भगतांची देवताषियक कथागीते,

४) शौर्यकथात्मक कथागीते किंवा पोवाडे

५) ओवी आख्याने

६) गदय + पदय मिश्रित कथा

७) इतर कथागीते''[२८]

## लोककथागीतांच्या व्याख्या :-

काही पाश्चात्य विद्वानांनी केलेल्या व्याख्यावरून ही संकल्पना स्पष्ट होते.

१) जी.एल.किटरेज (G.L.Kittredye) :- यांच्या मतानुसार गीताच्या माध्यमातून सांगितलेल्या कथेस लोककथागीत म्हणतात.

२) फ्रँक सिजविक (Frank Sidgwick) :- यांनी लोकसमूहात मौखिक रूपाने प्रचलित असलेल्या वर्णनात्मक किंवा निदेदनात्मक गीताला लोककथागीत म्हटले आहे.

३) डॉ. मरे (Dr. Murray) :- यांनी बॅलेडचा अर्थ (लोककथागीते) सांगताना असे म्हटले आहे की, समाजातील लोकप्रिय आख्यान प्रभावी प्रत्ययकारी स्वरूपात ज्यात सांगितलेले असते अशा स्फूर्तिदायक आणि उत्तेजन देणाऱ्या गीताला लोककथागीत म्हणतात.

यावरून लोकगीताच्या माध्यमातून व्यक्त होणारी कथा म्हणजे लोककथागीत होय. असे लोककथागीतांचे हे दालन समृध्द असून भारतीय लोकसंस्कृतीचे अनोखे देणे आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

## ४) लौकिक गीते :-

''लोकगीत आणि लौकिक गीत यांत अनेक वेळा लोकसाहित्याचे अभ्यासक गल्लत करतात आणि लौकिक गीतांना लोकगीत समजतात. या दोहोंतील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. आपण असे पाहिले की, लोकगीत हे लोकसमूहात मौखिक परंपरेने चालत आलेले गीत असून त्याचा कर्ता अज्ञात, अनामिक असतो. त्यातुन लोकसमूहाच्या मानसाची अभिव्यक्ती होत असून लोकजीवनाचे एक अभिन्न अंग असते. लोकगीतांच्या मागे शतकानुशतकांची परंपरा असू शकते. लौकिक गीत देखील परंपरेने आलेले असते. असे असले तरी त्याचा उगम असाक्षरांत नसतो. ती लोकसमूहाची निर्मिती नसते. त्याचा संबंध लोकजीवनाशी घनिष्ठ असला तरी त्यातून लोकजीवनाचा अविष्कार होतो किंवा ते लोकजीवनाशी अनिनत्वाने निगडीत

असते. अशी स्थिती नसते. त्याची निर्मिती कोणत्यातरी व्यक्तीने केलेली असते. त्याचा आधार वाङ्मयीन ललितकृती असतो. लौकिकगीत हे व्यक्तिनिर्मित असून त्यात निर्मात्याचे रचना कौशल्य प्रकट होते.''[२९]

डॉ. प्रभाकर मांडे यांच्या वरील वक्तव्यातून लौकिकगीते ही लोकगीते नसून त्यांची काही वेगळी वैशिष्टये आहेत हे सिध्द होते. तर लौकिक गीते कोणती याबाबत पुढे ते सांगतात की, काही गीतांचा कर्ता कोणी आहे हे माहित नाही तरी समाजाने त्याचा स्वीकार केलेला असतो आणि परंपरेने ते रूढ आहे म्हणून ही गीते लोकगीते ठरत नाहीत. ती लौकिकगीते होत. देशोदेशींची राष्ट्रगीते, समरगीते, प्रार्थनागीते ही सर्व अशी लौकिकगीते असतात कारण त्यामागची परंपरा विस्तृत असली तरी ती वाङ्मयीन असते. ती गीते व्यक्तिनिर्मित असतात. ती लोकसमूहाची निर्मिती नसते.

## लौकिक गीतांचे अध्यात्मिक रचनाप्रकार :-

ही लौकिक गीते कथात्मक असतात. ही कवने कुणीतरी रचलेली असतात आणि रचणाऱ्यांच्या नावाचा उल्लेख गाण्याच्या शेवटी गोविलेला असतो. काही वेळा गाण्याच्या आशयावरून त्याच्या कर्त्याच्या नावाचा उल्लेख होत असतो.

१) दंडारी, २) डहाकाची गीते, ३) बाणफळ मृगतर आणि माऊली, ४) कानबाईची गाणी, ५) कलगीतुऱ्याची शाहिरी, ६) भगतांची लौकिकगीते, ७) संतांची भारूडे, ८) आरत्या (लौकिकगीतेच होय)[३०]

यावरून लौकिक गीतांचे वेगळेपण समजते व त्याचे स्वरूपही लक्षात येते.

असे हे लोकसाहित्य अतिशय व्यापक स्वरूपाचे आहे. त्याचे महत्त्व त्याची विशालता फार मोठी आहे. खरोखरच लोकसाहित्याची गरज निर्माण झाली आहे. प्राचीन संस्कृतीची ओळख होण्यासाठी लोकसाहित्य गरजेचे आहेच त्याचबरोबर संस्कृतीचे पुढे सातत्य टिकविण्यासाठीही याचा उपयोग होतो. याचबरोबर अनौपचारिक शिक्षणाचे महत्वपूर्ण माध्यम म्हणून लोकसाहित्याचे महत्व खूप आहे.

असाक्षर समाजाला लोकसाहित्यातून अप्रत्यक्षपणे शिक्षण मिळते. तसेच लोकसाहित्य विविध प्रकारच्या साहित्याची गंगोत्री आहे कारण पारंपरिक गीते, कथा, संगीत, नृत्य यातूनच आजचे कलाप्रकार अस्तित्वात आले आहेत. लोकसाहित्याचे निरीखण केले तर त्यातील प्रत्येक प्रकार समृध्द संपन्न असा आहे. लोकगीते हे तर लोकसाहित्याचे प्रमुख अंग होय. त्याबरोबर लोककथा, लोकनृत्य, लोककथागीते ही अंगेही तितकीच मनोरंजक आहेत. तसेच प्रबोधन करणारी आहे. लोकसाहित्याचा होत चाललेला ऱ्हास ही समस्या बनत चालली आहे. टी.व्ही. चॅनेलच्या युगात वावरणाऱ्या तरूण मंडळींना लोकसाहित्याची गोडी लावली पाहिजे कारण त्यामध्ये लोकजीवनाची व लोकसंस्कृतीची चित्रे रेखाटलेली आहेत. प्राचीन काळापासून ग्रामीण लोकांनी हे साहित्य जीवापाड जतन केले आहे. आता जबाबदारी आपली आहे. एम.ए.च्या अभ्यासक्रमात लोकसाहित्याचा सामावेश केलाच आहे त्यामुळे किमान लोकसाहित्याची ओळख होण्यास मदत होते.

लोकमनावर संस्कार करण्याचे, राष्ट्रीय जाणीव निर्माण करण्याचे सर्व मानवजातीमध्ये बंधुभाव वाढविण्याचा उपदेश लोकसाहित्याद्वारे आपण करू शकतो. म्हणजे समाज जागृतीच्या दृष्टीने आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याच्या हेतूने लोकसाहित्याचा फार चांगला उपयोग होऊ शकतो. मानवी जीवनाला संपन्नता प्राप्त करून देण्याचे आणि साहित्याला अधिक समृध्द बनविण्याचे सामर्थ्य लोकसाहित्यामध्ये आहे. त्यामुळेच लोकसाहित्याचा अभ्यासही आवश्यकच आहे. त्यादृष्टीने लोकसाहित्याच्या अभ्यासाचे मराठीत अधिकाधिक प्रयत्न व्हायला हवेत.

डॉ. गंगाधर मोरजे देखील लोकसाहित्याची गरज विशद करताना म्हणतात की, ''लोकसाहित्य हे वर्तमान असते असे म्हटले जाते ते भूतकाळापासून आताच्या वर्तमानापर्यंत आमच्या आजच्या जीवनपध्दतीच्या परंपरा घेऊन आलेले असते. म्हणजे आम्ही ज्या फलित रूपात उभे आहोत, त्या झाडाची पाळेमुळे कोणत्या परंपरेमध्ये रोवली गेली, बळकट झाली, त्याचे स्वरूप कळण्यासाठी लोकसाहित्य हे

साधन आहे. आमच्या उभे राहण्यामागील भाषा, सांस्कृतिक परंपरेचा वारसा कळला तरच आम्हाला इतर भाषिक सामाजिक, सांस्कृतिक, परंपरांच्या संदर्भात अर्थ लाभत असतो म्हणून सामाजिक, सांस्कृतिक आदी जीवन अंगांचा अर्थ लावण्यासाठी लोकसाहित्य जतन करायला हवे.''[३१]

आपण कोणत्या संस्कृतीत वावरतो त्याचे मूळ काय आहे याची कल्पना येण्यासाठी लोकसाहित्य गरजेचे आहे असे त्यांचे मत आहे. यांच्याप्रमाणेच डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. शरद व्यवहारे, कमलाबाई देशपांडे, डॉ. सरोजिनी बाबर, डॉ. दूर्गा भागवत, डॉ. रा.चि. ढेरे, डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे, डॉ. तारा भवाळकर, डॉ. मधुकर वाकोडे आदी लोकसाहित्यविशारदांनी लोकसाहित्याच्या आवश्यकतेबरोबर त्यामध्ये मोलाचे संकलन व संशोधन केले आहे. आज अशाच संशोधन दृष्टीची गरज आहे. हे लोकसाहित्याचे ऋण आपण त्याला जतन करून फेडायला हवे अन्यथा या कालप्रवाहात ते लुप्त होण्याची शक्यता आहे.

## लोकगीते

प्रस्तावना :-

लोकसाहित्याच्या विविध अंगांची आपण माहिती पाहिली. यानंतर लोकसाहित्याचे एक देखणे कलात्मक, अनोखे अंग म्हणजे लोकगीते यांची आपण विस्ताराने माहिती पाहणार आहोत. लोकसाहित्याला पडलेलं सुंदर स्वप्न असा या लोकगीतांचा उल्लेख केला जातो. लोकसाहित्याचा आस्वाद घ्यायचा असेल तर लोकगीतांशिवाय पर्याय नाही. मनातील भावभावना व्यक्त करण्याचे मुख्य माध्यम म्हणजे काव्य. हे आपल्या अशिक्षित, अडाणी पूर्वजांनी ओळखले असले पाहिजे. त्याशिवाय त्यांनी या माध्यमाची निवड केली नसेल. लोकगीतांमध्ये भरलेलं सौंदर्य इतकं विलोभनीय आहे की, जेव्हा आपण त्याचा अभ्यास करतो तेव्हा त्यातील एकेक वैशिष्टय आपल्या मनात भरतं आणि ते लोकगीत आपलच होऊन जातं ही किमया या लोकगीतांकडे आहे. हेच त्याचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे. लोकगीत वाचताक्षणी

आपण त्याकडे आकर्षिले जातो. कारण त्यामध्ये केवळ गेयता नाही तर एक अर्थपूर्ण आशय देखील आहे. ही अर्थपूर्ण आशयनिर्मिती अशिक्षित, अडाणी व रानटी समजल्या जाणाऱ्या लोकांकडून झाली आहे. समजल्या जाणाऱ्या लोकांकडून झाली आहे ही आश्चर्यकारक गोष्ट आहे. तसेच या लोकगीतांचा मूलस्त्रोतही फार प्रचंड आहे. त्यामुळे याबाबतीतील संशोधन व संकलनाचे काम अधिक काळ चालेल.

भारतात लोकगीतांची परंपरा फार प्राचीन आहे. लोकगीतांची निर्मिती फार जुनी आहे. या लोकगीतांचा अभ्यास किंवा संशोधन ज्यावेळी सुरू झाले त्यावेळीपासून त्यांची निर्मिती, व्याख्या, प्रकार याविषयी संशोधन झाले आहे. अनेक लोकसाहित्य विशारदांनी त्यांची निर्मितीविषयी आपली मते मांडली आहेत. त्याचा परामर्श पुढील प्रमाणे :-

<u>लोकगीतांची निर्मिती</u> :-

लोकसाहित्याच्या निर्मितीविषयी ना.रा. शेंडे म्हणतात की, ''शून्यातून ध्वनी निर्माण झाला. पुढे त्यातून अक्षरे निनादली अक्षरांनी शब्द बनला. शब्दांनी आकार घेऊन एक वेगळे रूप प्रकट केले आणि त्यातून मनुष्य व्यक्त होऊ लागला, त्याने आपल्या सहजस्फूर्त भावनांद्वारे अविष्कार घडविला. त्या अविष्कारात लोकगीताचा जन्म झाला. तो संगीतबध्द झाला. त्याने वातावरणात चैतन्य निर्माण केले.''[३२] याचाच अर्थ माणूस जेव्हा बोलू लागला शब्दांची निर्मिती झाली. त्यातून भावना व्यक्त कराव्या असे वाटले असावे आणि मानवाने गीताच्या माध्यमातून या भावना व्यक्त करण्यास सुरूवात केली असावी त्यावेळी हे माध्यम अधिकाधिक योग्य आहे अशी त्यांची खात्री झाली असावी व यातूनच लोकगीताची संपदा वाढीस लागली असावी असा निष्कर्ष काढावा वाटतो.

डॉ. प्रभाकर मांडे देखील म्हणतात की,'समाज अस्तित्वात येऊन त्याचे सामूहिक जीवन सुरु झाले तेव्हापासून लोकगीतांची परंपरा अव्याहतपणे सुरु असली पाहिजे. जेव्हापासून लिखित वाङ्मय उपलब्ध आहे तेव्हापासूनच्या

सगळ्याच वाङ्मयातून लोकगीतांचे उल्लेख सापडतात. त्यावरून त्या त्या काळी लोकगीते समाजात प्रचलित होती असे दिसते. वेदब्राह्मण संघ, पुराणे त्याचप्रमाणे बौध्द, जैन वाङ्यात लोकगीतासंबंधीचे उल्लेख ठिकठिकाणी सापडतात.''[३३]

लोकसाहित्य हे जाणीवपूर्वक निर्माण केले जात नाही असे आपण म्हटले आहेच. त्याचप्रमाणे लोकगीताची निर्मितीदेखील सहज होणारी आहे. या संदर्भात जर्मनमधील ग्रिम बंधूंची मते विचारात घेण्यासारखी आहेत. जेकब ग्रीम हा भाषाशास्त्रज्ञ होता त्याच्या मते ''लोकगीतांची किंवा लोककथागीतांची निर्मिती आपोआप होते. लोकगीतांच्या निर्मितीचे श्रेय कोणत्याही एका व्यक्तीला देता येत नाही. लोकसमूहातील सगळेच लोक निर्मितीप्रक्रियेत सहभागी असतात. लोकगीते ही सहज निर्माण होतात. लोकगीतांची निर्मिती घडते. या अर्थाने लोकगीते स्वयंभू असतात. व्यक्ती जाणीवपूर्वक लोकगीताची निर्मिती करत नाही.'' तसेच पुढे ग्रीम म्हणतो, ''ज्याप्रमाणे इतिहासाची निर्मिती केली जात नसते ती घडत असते त्यप्रमाणे लोकगीतांची निर्मिती केली जात नाही ती घडत असते.''[३४]

वरील मतांनुसार लोकगीतांची परंपरा प्राचीन आहे. मानवाच्या आदिम अवस्थेतही त्याचे प्रचलन आहे. तसेच समाजाचे असित्व जितके प्राचीन तितकीच लोकगीतांची परंपरा प्राचीन आहे असे अनुमान काढता येते. लोकगीतांच्या लिखित वाङ्मयातून या परंपरेचा मागोवा घेता येतो.

लोकगीताची व्याख्या अनेक लोकसाहित्यविशारदांनी केल्या आहे त्या व्याख्यांमधून कमी जास्त प्रमाणात लोकगीतांची लक्षणे स्पष्ट झाली आहेत. परंतु लोकसाहित्याच्या व्याख्येप्रमाणेच परिपूर्ण व्याख्या कोणालाच करता आली नाही.

लोकगीताच्या काही प्रमुख लक्षणांवर प्रकाश पडेल अशा काही व्याख्या पुढील प्रमाणे :

१) लोकगीते म्हणजे ज्या लोकसमूहाचे वाङ्मय अलिखित आणि मौखिक परंपरेने चालत येते त्याचे संगीतमय गीत. (Standard Dictionary of folklore Mythoye & Legend Part 2, Page No.1032)

२) लोकगीत म्हणजे आदिकालीन स्वयंस्फूर्त संगीत. (ए.सायक्लोपीडीया ब्रिटानिका भाग ९ पृ. ४४७ वरून)

३) अज्ञात व्यक्तीने रचलेले समाजातील मौखिक परंपरेने संक्रमित होणारे संगीत.

४) लोकगीत नवेही नसते आणि जुनेही नसते. वनातील वृक्षाप्रमाणे त्याची मुळे भूतकाळात खोलवर रूजलेली असतात, परंतु तिला नित्यनूतन शाखा पुष्पफळे येत असतात. (व्ही. विलियम)

५) लोकगीताचे मूळ समूहाच्या संगीतात असते. (देवेंद्र सत्यार्थी)

६) लोकगीत अशा लोकसमूहाच्या जीवनाची स्वयंस्त्रोत अभिव्यक्ती आहे जे अधिकतर आदिम अवस्थेत जीवन जगतात. (के.बी.दास)

७) लोकगीत लोकसमूहाच्या संस्कृतीचे चित्र असते. (वासुदेवशरण अग्रवाल)

८) लोकगीत आमच्या जीवन विकासाचा इतिहास आहे. (डॉ. तेजनारायण लाल)

९) सामान्य लोकजीवनाच्या पार्श्वभूमीवर सहजरूपाने मनोभावांची झालेली लयात्मक अभिव्यक्ती म्हणजे लोकगीत होय. (डॉ. चिंतामणी उपाध्याय)

१०) ज्या गीतात लोकमानसाची अभिव्यक्ती असते अशा गीतांचा सामावेश लोकगीतात होईल. (डॉ. सत्येंद्र)

११) अमूक एका व्यक्तीची कारागिरी त्याच्यात दिसणे शक्य नसते. लोकगीते उत्सवप्रसंगी भक्तीभावाने तल्लीनता प्राप्त झाली असता व सामाजिक मन एकतान झाले असता निर्माण होतात. अर्थात कोणत्याही एका व्यक्तीला अशा गीतांवर हक्क सांगता येत नाही. (वि.का.राजवाडे)[३५]

प्रस्तुत व्याख्यांमधून लोकगीताची काही स्वरूप वैशिष्टये पाहायला मिळतात ती पुढील प्रमाणे-

१) लोकगीतांची परंपरा मौखिक असते.

२) त्यांचा कर्ता अज्ञात असतो.

३) लोकगीते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतात.

४) लोकगीतात कालानुरूप बदल होतात.

५) लोकगीते बोलीभाषेत असतात.

६) लोकगीते गेय असतात.

७) लोकगीते मंत्रात्मक स्वरूपाची असतात.

८) लोकगीत एका व्यक्तीची निर्मिती नसते तर समूह मनाची असते.

९) या गीतांमुळे समूहभावना वाढीस लागते तसेच समूहाच्या भावभावना व्यक्त होतात.

१०) लोकगीतामधून लोकजीवनाचे दर्शन घडत असते.

११) लोकगीतांत स्त्रियांची, पुरूषांची व लहान मुलांची गीते असतात.

१२) अधिकाधिक निर्मिती स्त्रियांनी केली असल्याने स्त्री-गीतांची संख्या विपुल आहे.

१३) काही लोकगीते प्रश्नोत्तर स्वरूपाची असतात.

१४) लोकगीतातून अनेक संकेत आढळतात.

१५) लोकगीतांचा उपयोग मनोरंजनासाठी, श्रमपरिहारासाठी केला जातो.

१६) लोकजीवनातील रूढी, परंपरा, लोकसमजुती यांचे देखील दर्शन होत असते.

१७) लोकगीतामध्ये काही निरर्थक शब्दांची योजना केलेली असते तर काही शब्दांची पुनरावृत्ती केलेली असते.

१८) लोकगीतात यमक रचना विपुल असली तरी अलंकार मात्र फारसे नसतात.

वरील वैशिष्टयांवरून लोकगीताचे स्वरूप लक्षात येते. लोकगीतांची वैशिष्टये वैविध्यपूर्ण आहेत. त्यामुळे एक प्रकारचे सौंदर्य त्यामध्ये भरलेले आहे. लोकगीतांकडे नजर टाकली की त्यातील विविध प्रकारची, विविध प्रसंगाची लोकगीते पाहिल्यावर

आश्चर्य वाटते. कोणत्याही प्रकारची शब्दांची जुळवाजुळव करून जाणीवपूर्वक तयार केलेली ही गीते नाहीत तर अगदी सहजासहजी घडलेली ही निर्मिती आहे. अशिक्षित, अडाणी लोक असूनही इतक्या सुंदर रचना पाहून मन फुलून निघते. खानदेशात जन्मलेली बहिणाबाई चौधरींचे काव्य पाहिलं की, त्या कोणत्या शाळेत गेल्या असतील असा प्रश्न पडतो. मात्र प्रत्यक्षात त्या जीवनाच्या शाळेत शिकून मोठ्या झाल्या होत्या.

'अरे घरोटा घरोटा नात्यातून पडे पीठी
तसं तसं माझं गाणं पोटातून येत ओठी'

यानुसार अगदी सहजपणे बहिणाबाई कविता रचत त्यासाठी कोणत्याही शब्दांचा शोध न घेता, गाणी गाताना आपोआपच शब्द ओठातून बाहेर पडत व त्याला अर्थ प्राप्त होत असे. प्राचीन स्त्रियांबाबत देखील हेच म्हणता येईल. जात्यातून भरभर पीठ पडायचे तसे त्यांच्या ओठातून गाण्याचे स्वर बाहेर पडत. म्हणजे अगदी सहजपणे सुचलेले हे काव्यविश्व आहे. आदर्श काव्याचे, वाङ्मयाचे कोणतेही निकष माहित नसताना निर्माण झालेले काव्य, गीते वाङ्मयीन दृष्टीनेही सरस मानावी लागतील.

कालप्रवाहाप्रमाणे लोकगीतांची नित्यनूतनता भासत असते कारण मौखिक रूपात जेव्हा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे लोकगीतांचे संक्रमण होते तेव्हा ते ते लोक काही नवीन शब्दांची भर त्यात घालतात त्यामुळे त्याच्या मूळच्या अर्थात फारसा बदल होत नाही पण त्या गीतांना नवीन रूप प्राप्त होते. या लोकगीतांना एक प्रकारची लय असल्याने त्या लयीमध्ये नवीन शब्दही मिसळून जातात म्हणूनच म्हणतात की, लोकगीत नवेही नसते आणि जुनेही नसते. परंतु पारंपारिक लोकजीवनाच्या, लोकसंस्कृतीचा, नातेसंबंधांचा, राहणीमान, रूढी, परंपरा, समजूती या सर्वांचा इतिहास पाहण्यासाठी मात्र लोकगीते फार उपयोगी साहित्य आहे. याबाबत सर्व लोकसाहित्य विशारदांची मते अनुकूल आहेत. याशिवाय

लोकगीतांची काही प्रयोजने आढळतात. त्यांच्यासाठीही ही गीते निर्माण झाली असावीत.

**<u>लोकगीतांची प्रयोजने</u> :-**

१) मनोरंजनासाठी गीतांची निर्मिती केली जाते. २) श्रमपरिहारासाठी, विरंगुळा म्हणून यांची निर्मिती होते. ३) धार्मिक विधी पार पाडण्यासाठी. ४) मनातील भाव-भावना व्यक्त करण्यासाठी. ५) मंत्रोच्चार करण्यासाठी. ६) लोकनृत्याला साथ देण्यासाठीही लोकगीतांचे निर्माण होते. ७) विविध देवदेवतांच्या उपासना करतानाही या गीतांची निर्मिती होते. ८) सामाजिक रूढी, परंपरांचे ज्ञान, माहिती देण्यासाठी. ९) लोकगीताच्या माध्यमातून नीती-अनितीचे शिक्षण देण्याबरोबर बोधासाठीही लोकगीतांची निर्मिती होत असे.१०) लोकगीतांमध्ये अधिक स्त्रियांची निर्मिती आहें कारण स्त्रिया काम करताना सोबत म्हणून, आधार म्हणून या गीतांची निर्मिती करत.

अशा अनेक प्रयोजनातून ही गीते साकार झाली असावीत अर्थात स्त्रियांची निर्मिती केवळ भावभावना व्यक्त करण्यासाठी झाली असली तरी पुरूषांची गीते, उपासकांची गीते, सामाजिक दृष्टीची गरते यांचा अल्पसा हतू नक्कीच असेल. त्यातूनच या प्रयोजनाची निर्मिती झाली. या लोकगीतांच्या अभ्यासातून असे अनेक घटकांची माहिती सिध्द झाली आहे. वेगवेगळ्या भागातील लोकगीतांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. उदा.

| | | |
|---|---|---|
| जे. एबर यांचे | - | पंजाबी लोकगीते - १८५४ |
| आर.सी.कॉलवेल | - | तामिळ भाषेतील लोकगीते-१८७२ |
| कै.वि.का. राजवाडे | - | लोकगीते - १९२५ |
| पा. श्री. गोरे | - | वऱ्हाडी लोकगीते |
| वि.ग. भिडे | - | श्रावणसरी - |

डॉ. सरोजिनी बाबर - मराठीतील स्त्रीधन, बाळरान, 'जा माझ्या माहेरा, एक

होता राजा, जनलोकांचा सामवेद इ.' (लोकगीत संग्रह)

डॉ. नांदापूरकर - तापीतरंग (खानदेशातील गीत संग्रह) माहेरचे मराठी,

मराठीचा मोहोर, मराठीची माया (मराठवाड्यातील गीत संग्रह)

डॉ. कमलाबाई देशपांडे - अपौरूषेय वाङ्मय-१९४४

साने गुरूजी - स्त्री जीवन[३६]

या संशोधन व संकलनामुळे अप्रकाशित मौखिक वाङ्मय प्रकाशात आले. तत्कालीन जीवनाचा इतिहास जाणून घेता आला. त्याबरोबर त्यातील सौंदर्यही पाहता, अभ्यासता आले. लोकसाहित्याचा तसेच लोकगीतासारख्या अनेक अंगांचा हाच मोठा फायदा ठरतो. संदर्भ साहित्य म्हणूनही त्याचे साहाय्य आपण घेऊ शकतो.

लोकगीताचे महत्व आपण प्रत्यक्ष पाहिले. पण त्यामधील गीतांची विविधता पाहिली की त्याचा विस्तारही लक्षात येईल. लोकगीतांचे वर्गीकरण पाहिल्यास त्याची खात्री पटते. अनेक लोकसाहित्य विशारदांनी लोकगीतांचे वर्गीकरण करण्याचे प्रयत्न केले. त्यासाठी काही निकषही लावले. त्यातून सर्व प्रकारची गीते सामावली गेली असे नाही त्यामध्ये बराच गोंधळही उडाला व काही त्रुटीही राहिल्या तरीही काही वर्गीकरणे स्थूल मानाने योग्य वाटतात ती खालील प्रमाणे -

वर्गीकरण :- लोकगीतांच्या सर्वांगिण अभ्यासासाठी त्यांच्या प्रकारांच्या अभ्यासासाठी वर्गीकरण आवश्यक असते. लोकगीताचे वर्गीकरण पुढील प्रकारांनी केले जाते.

अ) प्रादेशिकतेनुसार :- १) नागरी विभागातील लोकगीते.

२) ग्रामीण विभागातील लोकगीते

३) वन्य जमातींची लोकगीते.

ब) लोकगीते म्हणणाऱ्याच्या आधारावर :-

१) पुरूषांची लोकगीते

२) स्त्रियांची लोकगीते

क) जातीय तत्वावर आधारित १) भिल्लांची २) लमाण्यांची ३) कहारांची

३) मातंगाची गाणी इ.

ड) श्रीमती दुर्गा भागवत यांनी अलेक्झांडर क्रॉप यांनी लोकगीतांचे अंतरंग व बहिरंग यासंबंधीची लक्षणे सांगितली आहेत ती देऊन केलेले वर्गीकरण.

१) प्रणयगीते - स्त्री-पुरूष प्रेमभावनेचे चित्रण, अभिव्यक्ती.

२) नृत्यगीते - नृत्याच्या साथीने म्हणावयाची गीते.

३) विलपिते - मानवी दु:खभावनेने भरलेली गीते.

४) श्रमगीते - श्रमाची कामे करतानाची गीते, जगभर प्रचलन

५) स्त्रियांची गीते - स्त्रियांनी बालकांसाठी म्हटलेली गीते.

६) विधीगीते - लग्न, मुंज इ. विधींवेळीची गीते.

७) विनोदी गीते किंवा मालागीते- सर्वत्र आढळतात.

इ) लोकगीतांचे स्वरूप, लोकगीते म्हणणाऱ्या व्यक्ती, लोकगीते ज्या प्रसंगांशी आणि विधी उत्सवांशी संबंधित असतात ते विधीउत्सव, लोकगीतांचा आशय या सगळ्यांचा साकल्याने विचार करून मराठीत आढळणाऱ्या लोकगीतांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येऊ शकेल.

यामध्ये लोकगीते व लोककथागीते असे दोन विभाग पाडून पुन्हा त्यातील उपघटक विशद केले आहेत. तालिकेच्या स्वरूपात हे वर्गीकरण पुढील प्रमाणे :-

लोकगीते

- लोकगीते
  - बालकांची गाणी
    - बडबडगीते
    - तालगीते
    - नृत्यखेळ गीते
  - स्त्रियांची गीते
    - गीते (जात्यावरची गाणी, दळण कांडणाची गाणी वगैरे)
    - विधीगीते (लग्न, मुंज बारसे वगैरे)
    - नृत्यखेळगीते (फुगडी, पिंगा झिम्मा,फेराची इ.)
    - सण उत्सवाची (गौरी, हादगा वगैरे)
    - उपासना गीते (देवदेवतांची गाणी)
    - इतर
  - पुरुषांची गीते
    - श्रमगीते (भलरी मोटेवरील गुरे चारतानाची गीते)
    - विधीगीते (मार्तीक वगैरे)
    - भगतांची उपासना गीते (वासुदेव,गोंधळी,पोतराज, भराडी वाघे,धनगरांचे भगत इ. ची गाणी)
    - सण उत्सवांची गीते (मरीआईची यात्रा, होळीची गाणी वगैरे)''[३७]
    - इतर
- लोककथा गीते

वरील वर्गीकरण देखील स्वरूप भेदानुसार व प्रसंगानुसार आणखी प्रकार पाडता येतात. यातील प्रत्येक प्रकारची लक्षणे, त्याची रचना वेगळी आहे. प्रस्तुत पुस्तक 'वऱ्हाडी लोकगाथा' यामधील गीतांतही हे सारे प्रकार आहेत. त्यामुळे पुढील तीन प्रकरणामध्ये स्त्रियांचे कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन विशद करताना त्याच्या अनुशंगाने येणाऱ्या प्रकारांविषयी माहिती देण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष वऱ्हाडी लोकगीतांचा अभ्यास आपण पुढील प्रकरणांत करू.

जाता आणखी एक प्रश्न उरतो तो म्हणजे लोकगीते म्हणजे स्त्रीगीते का?

एकूणच लोकगीतांची निर्मिती व जडण-घडण यावर नजर टाकली तर ह्या लोकगीतांच्या निर्मितीमध्ये मोलाचा वाटा स्त्रियांचा आहे. कारण स्त्रीला आपण मुळातच अनेक विशेषणे जोडली आहेत म्हणजे स्त्री हळवी, भावनाशील प्रेमळ तसेच

आध्यात्मिक ओढ असलेल्या असतात. त्यांच्या या गुणांमुळे परंपरेनुसारच त्यांच्याकडे कष्टाची कामे सोपविली गेली कारण त्यासाठी ती विरोध करत नव्हती कारण तितके शारीरिक मानसिक बळ तिच्याकडे नसावे. या गोष्टीचा फायदा घेऊन सर्व शारीरिक कष्टाची कामे त्याचबरोबर सण-उत्सव साजरे करणे, कुटुंबकल्याणासाठी व्रतवैकल्ये, देवतांचे पूजाविधी, बालक जन्म, संगोपन इ. कामे स्त्रीनेच करावीत अशी अपेक्षा पुरुषप्रधान संस्कृतीने केली असावी त्यामुळे मुळातच हळवी, कोमल हृदयाची स्त्री विरोध करू शकली नसावी. पण हे सर्व करताना कुटुंबात दुय्यम वागणूक, हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या असतील आणि त्यामुळे या दु:खातून बाहेर पडण्यासाठी मन व्यक्त करण्यासाठी, आपल्या भावनांना या गीताच्या माध्यमातून वाट मोकळी करून दिली असेल म्हणून मग कोणताही सण-उत्सव असो किंवा घरातील कामे असो ती गात राहिली. या गीतांची साथ मिळाल्यामुळे ती आपलं दु:ख त्यातून व्यक्त करू शकली. पण कधी-कधी स्त्रीच्या विनोदबुध्दीची साक्षही काही गीतांतून पाहायला मिळते. म्हणूनच पुरुषापेक्षाही स्त्रीला या गीतांची गरज वाटली आणि त्यातून अधिकाधिक स्त्री गीतांचीच निर्मिती स्त्रियांनी केली असावी.

जातं व स्त्री यांचही फार पूर्वीपासून अगदी जवळच नात आहे त्यामुळे स्त्रीगीते म्हटल की ओवीगीते चटकन् आठवतात जात्यातील पीठाबरोबर तिच्या ओठातून ही गीते बाहेर पडत. वरील सर्व कारणांमुळे स्त्री-निर्मित गीतांची संख्या अधिक आहे. त्यामुळे लोकगीते म्हटलं की, स्त्रीगीते असा समज रूढ झाला.

डॉ. प्रभाकर मांडेही आपल्या 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह' या ग्रंथात पहिल्याच प्रकरणात सांगतात की, ''मराठी लोकसाहित्याचे जे संकलन झाले ते प्रामुख्याने स्त्रीगीतांचेच आहे. त्याचे कारण हे की, लोकसाहित्य म्हणजे लोकगीते आणि लोकगीते म्हणजेच प्रामुख्याने स्त्री-गीते अशी संकलनकारांची दृष्टी होती. स्त्री-गीतांच्या भावघन स्वरूपामुळे स्त्री-गीते रसिक मनाला भुरळ पाडू शकली.''

डॉ. तारा भवाळकरही 'लोकसंचित' पुस्तकात एके ठिकाणी म्हणतात की, 'तिच्या मनाला तो एक विरंगुळा तिनेच निर्माण केला होता आणि दळण-कांडणासारख्या श्रमात घामाबरोबर गळाही वाहत राहिला होता. एखाद्या सणावारानिमित्त खेळाफेराच्या गाण्यांतून तिचं मनही मोकळं होत राहिलं.''

म्हणजेच स्त्री हा एक महत्त्वाचा घटक या लोकगीत निर्मितीमध्ये असल्याने व एकूणच ओवीगीतांची संख्याही विपुल असल्याने लोकगीते म्हणजे स्त्रीगीते असे म्हटले आहे.

## लोकगीतातील वाङ्मयीन विशेष :-

लोकगीतातील वाङ्मयीन विशेष म्हणजे लोकगीतातील सौंदर्य, कल्पना, भावनाविष्कार, प्रतिमांचे स्वरूप, शैली, भाषा, शब्दकळा या सर्वांचे लोकगीतातून दिसणारे अस्तित्व.

लोकगीताचे स्वरूप प्रवाही असते. कालानुसार त्यामध्ये नवीन भर पडली तरी मूळचा आशय बदलत नाही. लोकगीतातील आशय समृध्द आहे. त्यामुळे ही गीते अर्थपूर्ण वाटतात. आशयसमृध्द गीतांमुळे त्यांना सौंदर्य प्राप्त झालेले असते. विषयांची विविधता असल्याने पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, देवताविषयक, कौटुंबिक, सांस्कृतिक संदर्भ असतात. त्यामुळे या प्रत्येक प्रकाराच्या आशयातून कधी पौराणिक देवतांचा सन्मान, ऐतिहासिक पात्रांचे गुणविशेष, सामाजिक रूढी परंपरांची माहिती, परमेश्वराविषयी भक्ती, नातेसंबंधामधील प्रेम किंवा सण-वारासंबंधीची भावना असे अनेक आशय प्राप्त होतात व त्या त्या प्रकारच्या वैशिष्टयांनुसार ते समोर येतात.

लोकगीतातील भावसौंदर्य अलौकिक आहे. हे भावविश्व कधी जिव्हाळ्याने ओतप्रेत भरलेले दिसते कधी मायबापाविषयी कृतज्ञता दिसते, कधी बालकांविषयी वात्सल्यपूर्ण रेखाटन दिसते, कधी देवाबद्दलची श्रध्दा तर कधी पतीविषयी नाजूक प्रेमभावना व्यक्त होताना दिसते.

15408

लोकगीतांमध्ये स्त्रिया गीतांची निर्मिती करताना रोजच्या जीवनातील अनेक प्रसंग कल्पना व प्रतिमाद्वारे चित्रित करतात. या प्रतिमा नित्य जीवनातील असल्याने अतिशय समर्पक असतात.

लोकगीतांची भाषा काव्यात्म असली तरी ती लवचिक असते. अनेक भाषांतील निरनिराळी रूपे पाहायला मिळतात. ठिकठिकाणी पुनरावृत्ती तसेच काही ठिकाणी निरर्थक शब्दयोजना असल्याने गीतातील लय कायम राहते. त्याला एकप्रकारची तालबध्दता येत असते. त्यामुळे वाद्यसंगीताचा अभाव असूनही ही गीते तालबध्दता येत असते. तसेच अनेक प्रकारचे संकेत यामध्ये पाळल्याचे दिसून येते.

स्त्रीगीतातील महत्वाचा भाग म्हणजे ओवीगीतांचा. या ओवीगातांमध्येही बहुतांशी वाङ्मयीन विशेष सामावलेले दिसतात. डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात, ''ओवीगीते हे लोकगीतातील एक अत्यंत संपन्न दालन, त्यात विविध भावनांची अभिव्यक्ती उत्कटत्वाने झाली आहे. भावनांचा उद्रेक, कल्पनेची भरारी, भाषेतील अलंकारिकता आणि साधेपणा हे लोकगीतांचे विशेष होत. सूक्ष्म बारकाव्यासह व्यक्तीदर्शनही आढळते.''[३८]

तसे पाहिले तर लोकवाङ्य ही खरी वाङ्मयकला असू शकत नाही. श्रेष्ठ वाङ्मयीन कलेचे गुणविशेष आपण या लोकवाङ्मयाला लावू शकत नाही. आज एक आदर्श कलाकृती म्हणून एखादया कवितासंग्रहाची निवड करतो तेव्हा जे काही वाङ्मयीन निकष असतात ते आपण त्या कलाकृतीला लावतो पण तेच निकष एखादया लोकगीत संग्रहाला लावले तर योग्य होणार नाही कारण लोकगीत असो किंवा इतर लोकवाङ्मय असो ही सारी निर्मिती निरक्षर असणाऱ्या समाजात झाली आहे हे विसरून कसे चालेल? म्हणूनच लोकवाङ्मयातून वाङ्मयीन गुणांचे दर्शन होईलच किंवा अशी अपेक्षा आम्ही करू शकत नाही. तरीही लोकवाङ्मयातून, लोकगीतांतून झालेले वाङ्मयीन गुणांचे दर्शन उल्लेखनीय आहे यात शंका नाही.

**समारोप :-**

प्रस्तुत प्रकरणात लोकसाहित्य या विषयी विस्तृत माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये लोकसाहित्याची प्राचीनता, त्याची निर्मिती, पारिभाषिक संज्ञा व अर्थ, व्याख्या, प्रयोजने, लक्षणे, लोकसाहित्याचे वर्गीकरण, त्याची अंगे व लो. अभ्यास, लोकनृत्य, लोककथागीते, लोककथा व लौकिक नृत्ये यांची स्वरूप वैशिष्टये थोडक्यात विशद केली आहे. त्याचबरोबर लोकसाहित्य जतन करण्याची गरज काय याचाही परामर्श घेतला आहे.

त्यानंतर लोकगीते या लोकसाहित्याच्या अनोख्या व कलात्मक अंगाचा विचार केला आहे. यामध्ये लोकगीतांची निर्मिती, व्याख्या, स्वरूप-वैशिष्टये, प्रयोजने, लोकगीतावरील प्रकाशित पुस्तके, लोकगीतांचे वर्गीकरण, लोकगीते म्हणजे स्त्रीगीते का म्हणतात? व लोकगीतांचे वाङ्मयीन विशेष या सर्व बाबी विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. यामधील सर्व माहिती अधिकाधिक योग्य व्हावी याचाही प्रयत्न केला आहे. तरी काही अंशी त्रुटी असतील यात शंका नाही.

या सर्व घटकांनीशी हे प्रकरण इथेच संपविते.

संदर्भ :-


१) 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह', डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रकरण ७, पान नं. ११४, द्वि.आ.१९९७.

२) 'लोकसाहित्य मिमांसा भाग-२' डॉ. विश्वनाथ शिंदे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पान नं. ७.

३) 'लोकसाहित्य मिमांसा भाग-२' डॉ. विश्वनाथ शिंदे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रकरण २, पान नं. ३१. प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट २००६.

४) 'लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास', डॉ. शरद व्यवहारे, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, पान नं. २, प्रथमावृत्ती १९८७.

५) 'लोकसाहित्य-एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र', डॉ. गंगाधर मोरजे, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे पान नं. ४७, प्रथमावृत्ती १९८५, द्वि. आ. १९९३.

६) 'लोकसाहित्य विचार', डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे, सविता प्रकाशन, औरंगाबाद, प्रकरण ५, पान नं. ३९.

७) 'लोकसाहित्याचे स्वरूप', डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पान नं. ८०, चौथी आवृत्ती २०००.

८) 'भाषा व साहित्य संशोधन खंड-२', प्रकरण 'लोकसाहित्यकला अभ्यास स्वरूप व पध्दती' 'गंगाधर मोरजे' यांचे लोकसाहित्याच्या निर्मितीविषयीचे मत, पान नं.२७९.

९) 'लोकसाहित्याचे स्वरूप', डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रकरण ५, पान नं. ८०, चौथी आवृत्ती २०००.

१०) 'मराठी स्त्री-गीते', डॉ. शरद व्यवहारे, प्रतिमा प्रकाशन, पान नं. १०.

११) 'लोकसंचित' डॉ. तारा भवाळकर, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २५ डिसेंबर १९७९, पान नं.५.

१२) 'लोकसाहित्य : उद्गम आणि विकास', डॉ. शरद व्यवहारे, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, प्रकरण १, पान नं. ३, प्रथमावृत्ती १९८७.

१३) 'लोकसाहित्य : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र', डॉ. गंगाधर मोरजे, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, द्वि.आ.१९९३, पुस्तकाच्या सुरूवातीला आपली भूमिका स्पष्ट करताना वरील विचार गंगाधर मोरजे व्यक्त करतात. आ. १ ली, १९८५.

१४) 'लोकसाहित्याचे स्वरूप', डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रकरण १, पान नं. १, चौथी आवृत्ती २०००.

१५) तत्रैव, पान नं. ५.

१६) तत्रैव, पान नं. ९.

१७) 'लोकसंचित', तारा भवाळकर, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २५ डिसेंबर १९८९, पान नं. २.

१८) 'लोकसाहित्य : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र', डॉ. गंगाधर मोरजे, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, द्वि.आ.१९९३, पान नं. १.

१९) 'लोकसाहित्याचे स्वरूप', डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, मांडे यांनी अनेकांच्या दिलेल्या व्याख्या पान नं. १५ ते २७ वरून, चौथी आवृत्ती २०००.

२०) तत्रैव, पान नं. ३०, ३१.

२१) तत्रैव, पान नं. ३२.

२२) 'लोकसाहित्याची रूपरेखा' दुर्गा भागवत, ग्रंथ संग्रहालय, मुंबई आवृत्ती १९५६, प्रस्तावना (दुर्गा भागवत) पान नं. ५

२३) 'लोकसंचित', तारा भवाळकर, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २५ डिसेंबर १९८९, पान नं. १, प्रस्तावना (लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या दिशा)

२४) 'लोकसाहित्याचे स्वरूप', डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रकरण १, पान नं. १७५-१७६, चौथी आवृत्ती २०००.

२५) तत्रैव पान नं. १८० वरून.

२६) 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह', डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पान नं. ८५, द्वि.आ.१९९७.

२७) तत्रैव, पान नं. ४१, ४२ वरून.

२८) 'लोकसाहित्याचे स्वरूप', डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पान नं. २९२, चौथी आवृत्ती २०००.

२९) तत्रैव, पान नं. ३०६-लौकिक गीते.

३०) तत्रैव, पान नं. ३१२.

३१) 'लोकसाहित्य : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र', डॉ. गंगाधर मोरजे, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, द्वि.आ.१९९३, प्रकरण ४, पान नं. ५६.

३२) 'मराठी स्त्री-गीते', डॉ. शरद व्यवहारे, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती-२ ऑक्टो. १९९१, पान नं. १५ वरून.

३३) 'लोकसाहित्याचे स्वरूप', डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पान नं. २३३, चौथी आवृत्ती २०००.

३४) तत्रैव, पान नं.७३, ७४.

३५) तत्रैव, पान नं. २४०, २४१.

३६) 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह', डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पान नं. ३, द्वि.आ.१९९७.

३७) 'लोकसाहित्याचे स्वरूप', डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पान नं. २६६ ते २७१, चौथी आवृत्ती २०००.

३८) 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह', डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पान नं. ३६, द्वि.आ.१९९७.